रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २२
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'काँग्रेसने महाराष्ट्राच्या मतदारांचा अपमान बंद करावा'/२
'नागरिकांनी मोदी सरकारच्या योजनांचा लाभ घ्यावा'/३
माथेरानमधील हातरिक्षा प्रथा बंद करण्याचे आदेश/५

## महाराष्ट्रातून मुरूडचा युवक राजपथावर 'मॉडेल लाभार्थी'



**मुरूड :** स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित विशेष समारंभासाठी मुरूड शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थी विजय लक्ष्मण चौलकर यांची विशेष निमंत्रित म्हणून निवड करण्यात आली. त्यांना राष्ट्रपती भवनाकडून अधिकृत आमंत्रण पत्रिका आणि समारंभासाठीचा पास देण्यात आला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून केवळ एकमेव लाभार्थी म्हणून विजय लक्ष्मण चौलकर यांना विशेष निमंत्रित करण्यात असल्याने रायगड जिल्ह्याच्या दृष्टीने ही अभिमानास्पद बाब ठरली आहे. मुरूड जंजिरा नगर परिषदेच्या वतीने प्रशासक सचिन बच्छाव यांनी लाभार्थी चौलकर यांचे विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले. राष्ट्रपती भवनात होणाऱ्या या समारंभात देशभरातून केवळ निवडक १० लाभार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून विजय चौलकर हे उपस्थित राहणार आहेत.

# गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा मानस -मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले





### पळस्पे ते कशेडी बोगदा रस्त्याची केली पाहणी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना रस्त्यांवरील खड्ड्यांचा जो त्रास होतोय, तो त्रास होवू नये, यासाठी शासनाकडून सर्व प्रकारच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा आमचा मानस असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गुरुवारी (दि.७) येथे केले.

मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मुंबई-गोवा महामार्गावरील सुरू असलेल्या रस्त्याच्या कामांची पाहणी केली, त्यावेळी ते बोलत होते. मुंबई गोवा महामार्गावरील कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी मंत्री शिवेंद्रराजे भोसले रायगड आणि रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर आहेत. पनवेल येथील पळस्पे फाटा येथून या पाहणी दौऱ्यास सुरुवात झाली.

या पाहणी दौऱ्यावेळी त्यांच्या समवेत आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रविशेठ पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, दक्षिण मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जीवन म्हात्रे, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग एम.एन.राजभोज, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ कोकण भवन सुषमा गायकवाड, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक यशवंत घोटकर आदी उपस्थित होते.

महाड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत ते म्हणाले की, मुंबई-गोवा राष्ट्रीय **(पान २ वर..)**

# ओबीसींसाठीचा लढा थांबणार नाही

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा ठाम निर्धार



**पणजी : वृत्तसंस्था**

गोव्यात सुरू असलेल्या ओबीसी महासंघाच्या अधिवेशनात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावली. या वेळी बोलताना त्यांनी ओबीसी समाजाच्या प्रगतीसाठी आपल्या सरकारच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. फडणवीस म्हणाले,माझ्यावर ओबीसी समाजाबद्दल बोलल्याबद्दल माझ्यावर टीका झाली. मला टार्गेट करण्यात आले. मला कितीही टार्गेट केलं तरीही मी ओबीसी समाजाच्या हक्कासाठी लढणार आहे आणि माझी लढाई चालूच राहणार आहे.

त्यांनी नमूद केले की, आपल्या ओबीसी विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणाच्या संधी खुल्या केल्या असून, अनेक विद्यार्थी याचा लाभ घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर शिकत आहेत. येत्या काळात या समाजासाठी आणखी चांगले निर्णय घेतले जातील. फडणवीसांच्या या विधानांमुळे अधिवेशनात नवचैतन्य निर्माण झाले असून, ओबीसी समाजातील अनेकांनी याचे स्वागत केले आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ओबीसी आहेत. आपल्या राष्ट्रीयस्तरावर ओबीसींचा बोलबाला झाल्याचे आपल्याला बघायला मिळाले. हेच नाही तर स्वातंत्र्य काळानंतर सर्वात जास्त ओबीसींना मंत्रिमंडळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्थान दिले. फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केलं की, जर गरज भासली, तर अधिवेशनात पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाईल. यासोबतच त्यांनी महाराष्ट्रासह गोव्यातही ओबीसी समाजाच्या हितासाठी ठोस निर्णय घेतले जातील, असा विश्वास व्यक्त केला. अधिवेशनात विविध विषयांवर फडणवीसांनी आपली मते मांडली असून, त्यांच्या भाषणातून सरकारचा ओबीसी समाजाविषयी असलेला सकारात्मक दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून आला.

## ट्रकने सहा जणांना चिरडले; चौघांचा मृत्यू; दोघे जखमी

**गडचिरोली : प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यातील काटली गावात आर्मोरी - गडचिरोली महामार्गावर सहा मुलांवर काळाचा घात झाला. मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या सहा मुलांवर भरधाव ट्रकने धडक दिली ज्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर दोघांना उपचारासाठी रुग्णालयात घेऊन जाताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ही चारही मुलं अल्पवयीन होती. तर दोन जखमी मुलांना नागपुरातील रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. त्यांनी द वर पोस्ट करत मृतांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त केल्या आणि म्हणाले, आर्मोरी-गडचिरोली महामार्गावरील हा अपघात अत्यंत दुखद आहे. मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी चार लाख रुपये सानुग्रह अनुदान दिलं जाईल आणि जखमींच्या उपचाराचा सर्व खर्च सरकार उचलेल. जखमींना नागपूरला हलवण्यासाठी हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही मुलं लष्करात भरती होण्याचं स्वप्न बघत होती आणि त्यासाठी नियमित व्यायाम करत होती. या अपघातामुळे त्यांच्या कुटूंबियांच्या स्वप्नांचा चुराड झाल्याने स्थानिकांमध्ये तीव्र दुःख पसरलं आहे.

## 'रायगड'चा पायरी मार्ग कोसळला

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर जाण्यासाठी असणारा पायरी मार्गाचा आज दुपारी काही दगडी भाग कोसळला. महादरवाजाच्या जवळील हा भाग कोसळून मार्ग नादुरुस्त झाला आहे. दरम्यान, या मार्गानेच हजारो शिवभक्त गडावरती ये-जा करत असतात. जरी कोणत्याही प्रकारची दुर्घटना झाली नसली तरी भविष्यात हा मार्ग धोकादायक ठरू शकतो.

रायगडवर चित्तदरवाजा इथून जाणारा पायरी मार्गाचा महादरवाजा येथील काही भाग गुरुवारी दुपारी कोसळला. कोसळल्या भागामुळे हा मार्ग नादुरुस्त झाला असून पर्यटकांसाठी आजचा दिवस हा मार्ग बंद ठेवण्यात आला आहे. सा.बां. विभागाच्या वतीने या ठिकाणी तात्पुरते पाईप बांधून मार्ग सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला आहे, मात्र असे असले तरी येणाऱ्या काळात कोसळणाऱ्या पावसामुळे किल्ले रायगडवरती जाणारा हा पायी मार्ग धोकादायक ठरू शकतो.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत व माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या वतीने विविध कल्याणकारी योजना तसेच आरोग्य शिबिर राबविण्यात आले. या वेळी आयोजकांनी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह मान्यवरांचे स्वागत केले.** (वृत्त पान ३ वर)

## निवडक

### नागपूर-पुणे वंदे भारत ट्रेन येत्या रविवारपासून धावणार

**मुंबई :** नागपूर (अजनी) ते पुणे आणि पुणे ते नागपूर (अजनी) अशी वंदे भारत एक्सप्रेस रविवार १० ऑगस्ट २०२५ पासून धावणार आहे. यामुळे नागपूर (अजनी) ते पुणे हा प्रवास बारा तासांत होणार आहे. प्रवासाचा वेळ तीन तासांनी कमी होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी या वंदे भारत एक्सप्रेसचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करणार आहेत.

### नागरिकांचे आरोग्य महत्त्वाचे; कबुतरखान्यांवरील बंदी कायम

**मुंबई :** दादरसह मुंबईतील कबुतरखान्यांसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात गुरुवारी तातडीची सुनावणी झाली. न्यायालयाने आजच्या सुनावणीत कबुतरखान्यांवरील बंदी कायम ठेवली असून एक समिती नेमण्याचे आदेशही दिले आहेत. या प्रश्नावर दोन्ही बाजूंनी विचार व्हायला हवा, त्यामुळेच एक समिती नेमण्यात यावी. कबुतरांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका होणार नाही हे या समितीने ठरावावे, त्यानंतरच समितीचा निर्णय सर्वांनी स्वीकारावा, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

# मासेमारी व्यवसाय अभिमानाचा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मासेमारीचा व्यवसाय अभिमानाचा व्यवसाय आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मच्छीमार संस्थेच्या उद्घाटनावेळी केले.

राधा राम मच्छिमार सहकारी संस्थेची ६५ सदस्यांनी एकत्रित येऊन स्थापना केली आहे. त्यानुसार या संस्थेचे कार्यालय खारकोपर येथील मराठी शाळेजवळ सुरू झाले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याहस्ते आणि भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे यांच्या उपस्थितीत नुकतेच झाले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगीतले की, ६५ सदस्यांनी एकत्रित येऊन ही सोसायटी स्थापन केली असून लवकरच ही संस्था मोठी होईल, त्यामुळे लहानातून मोठे होत असताना गर्व न बाळगता स्वाभीमानाने काम करा, असे प्रतिपादन केले.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, ज्येष्ठनेते पांडुरंग घरत, जितेंद्र म्हात्रे, भाऊशेठ पाटील, सुधीरशेठ ठाकूर, वामनशेठ ठाकूर, रमेश ठाकूर, लालचंद घरत, अनंत ठाकूर, भाऊशेठ भोईर, व्ही.के.ठाकूर, सी.एल.ठाकूर, रामदास नाईक, सतीष कोळी, मानीक कोळी, चंद्रकांत कोळी, चेअरमन नामदेव ठाकूर, गुरुप्रसाद म्हात्रे, श्रीधर मोकल, प्रमोद ठाकूर, विष्णू कोळी, नरेश मोकल, कुंदन म्हात्रे, प्रवीण ठाकूर, सुरज घरत, नरेश ठाकूर, रतन ठाकूर, रमण पाटील, अमीत पाटील, रोहन कोळी, नारायण कोळी, महेंद्र कोळी, राजेंद्र मोकल, दिपक पाटील, नारायण पाटील, मयुर मोकल, ताणाजी ठाकूर, गणेश गोंधळी प्रमोद ठाकूर आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत 'उत्सव गणपतीचा, जागर पर्यावरणाचा' ही संकल्पना घेऊन एक विशेष पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या पोस्टरचे अनावरण मुख्यालयात परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे व उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या हस्ते करण्यात आले.

ही स्पर्धा घरगुती व सार्वजनिक दोन्ही गटांसाठी खुली आहे. या स्पर्धेमध्ये पर्यावरणपूरक मूर्ती, सजावट साहित्य, नैसर्गिक रंग, पुनर्वापर करण्यायोग्य वस्तू यांचा वापर अनिवार्य आहे. या स्पर्धेसाठी एकूण १ लाख रूपयांची बक्षीस राहणार आहेत. सहभागासाठी स्पर्धकांनी २४ ऑगस्ट २०२५पर्यंत www.pmc.majhivasundhara.org या अधिकृत वेबसाईटवरती नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक: ७४०० १०० ७३७ याबरोबरच नागरिकांनी व मंडळांनी दिलेल्या QR कोडद्वारे किंवा संकेतस्थळावर जाऊन आपली नोंदणी करू शकतात.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला राष्ट्रीय शाळा पुरस्कार




**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघरने नवी दिल्ली येथे आयोजित एका भव्य समारंभात सर्वोत्तम शैक्षणिक सुविधा या श्रेणीत राष्ट्रीय शाळा पुरस्कार २०२५ जिंकून आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

या अभिमानास्पद कामगिरीसाठी शाळेने संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक उत्कृष्टतेसाठीच्या त्यांच्या अढळ वचनबद्धतेबद्दल मनापासून आभार मानले. शाळेने जे.बी.एस.पी. संस्था व्यवस्थापनाच्या प्रगतीशील दृष्टिकोन, अनुकरणीय मार्गदर्शन आणि **(पान २ वर..)**

# महिलांनी प्रत्येक क्षेत्रात सक्षम व्हावे -अ‍ॅड.माधवी नाईक

### पनवेलमध्ये हातमाग साडी प्रदर्शन आणि खेळ पैठणीचा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अष्टावधानी असण्याचे वरदान हे महिलांनाचा आहे. त्यामुळे महिला ज्या क्षेत्रात पाऊल टाकेल त्यामध्ये ती सक्षमतेने स्वत:चे स्थान निर्माण करून शकते, असे प्रतिपादन भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तथा विमानतळ प्राधिकरणाच्या स्वतंत्र संचालीका अ‍ॅड.माधवी नाईक यांनी पनवेलमध्ये महिलांसाठी आयोजीत केलेल्या कार्यक्रमावेळी केले. या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला ठाकूर यांनीही भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

भाजप महिला मोर्चा पनवेल शहर तर्फे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच हातमाग दिवसाचे औचित्य साधून वस्त्रवारसा हातमाग साडी प्रदर्शन, फॅशन शो तसेच खेळ पैठणीच्या कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश सरटिणीस तथा विमानतळ प्रधिकरणाच्या स्वतंत्र संचालीका अ‍ॅड. माधवी नाईक यांच्या हस्ते आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाले. पनवेलकरांनी या प्रदर्शनाला भरभरून प्रतिसाद दिला. भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्ष रुचिता लोंढे आणि पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव यांच्या पुढाकाराने आयोजित प्रदर्शनात विविध प्रकारचे हातमाग साड्यांचे स्टॉल्स लावण्यात आलेत.

यामध्ये विणलेल्या पैठणी साड्या, तसेच अन्य पारंपरिक हातमागावरील वस्तूंचे प्रदर्शन करण्यात आले. याव्यतिरिक्त, खेळ पैठणीचा यांसारखे मनोरंजक खेळही आयोजित करण्यात आले होते. ज्यामुळे महिलांचा सहभाग अधिक वाढला. या कार्यक्रमाची आणखी एक खास बाब म्हणजे, फॅशन शो! या फॅशन शो मध्ये महिलांनी हातमागावरील साड्या परिधान करून रॅम्प वॉक केला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तुम्ही दिलेल्या शुभेच्छा आणि आर्शिवादामुळे मला अधिक काम करण्याची उर्जा मिळते असे सांगून आयोजकांचे कौतुक केले. **(पान २ वर..)**

## सन आयलाय गो...



**मुरूड : राजपुरी समुद्रकिनारी नारळी पौर्णिमेनिमित्त आपली नौका समुद्रात ढकलण्याची कोळी बांधवांची शतकांची परंपरा आजही कायम आहे, पण सध्या मनुष्यबळाची कमतरता भासत असल्यामुळे या परंपरेत थोडा बदल होत असून अनेक ठिकाणी ट्रॅक्टरच्या सहाय्याने होड्या समुद्रात उतरवण्याची गरज भासते. अशा प्रकारे परंपरा आणि आधुनिकतेचा अनोखा संगम येथे पाहायला मिळतो.** (छाया : सुधीर नाझरे)

# यंदाही घरोघरी हर घर तिरंगा मोहीम

## ■ पनवेल महापालिकेचे महत्वपूर्ण अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत घरोघरी तिरंगा' ही मोहिम २०21 पासून देशात सर्वत्र राबविण्यात येत आहे. ही मोहिम या वर्षी २०२५ मध्ये देखील राज्यात मोठ्या प्रमाणात राबविण्यात येणार आहे. त्यानुसार पनवेल महानगरपालिकेमार्फत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'घरोघरी तिरंगा-हर घर तिरंगा' मोहिम पनवेल महानगरपालिका क्षेत्रात १५ ऑगस्ट पर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबविली जाणार आहे. यात नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घ्यावा असे आवाहन पनवेल महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे.



लोकांच्या हदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्र ध्वजाबद्दल जागरूकता वाढविण्याच्यादृष्टीने ' घरोघरी तिरंगा' ही लोकचळवळ राबविण्यात येणार आहे. ही मोहिम विविध उपक्रमांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. यात प्रामुख्याने शाळेच्या भिंती तिरंगा कलाकृतीने सजविणे. शाळा, शासकीय इमारती, सार्वजनिक जागा या ठिकाणी तिरंगा प्रदर्शनाचे आयोजन करणे त्याचप्रमाणे शाळा, महाविद्यालये, मॉल आदि ठिकाणी तिरंगा रांगोळी स्पर्धा , तिरंगा कार्यशाळा, प्रात्याक्षिके याचे आयोजन करणे. त्या सोबतच तिरंगा राखी निर्मिती, तिरंगा प्रश्नमंजुषा, तिरंग्याच्या भावनेचा गौरव करणेसाठी भारतीय जवान व पोलीस कर्मचारी यांच्यासाठी पत्रलेखन अशा स्पर्धांचे ही आयोजन करण्यात आले आहे. घरोघरी तिरंगा वेबसाईट वर स्वयंसेवक नोंदणीसाठी विशेषत युवा वर्ग, विद्यार्थी, बचत गट यांनी पुढाकार घ्यावा. तिरंगा स्वयंसेवकाचे प्रमाणपत्र या वेबसाईट वरुन डाउनलोड करावे, असे ही आवाहन या निमित्ताने करण्यात येत आहे. त्यासोबतच पनवेल महानगरपालिका मुख्यालय व इतर कार्यालये, बाजारपेठा, पुल महत्त्वाची ठिकाणे या जागेवर तिरंगा प्रकाश योजना करून विद्युत रोषणाई ही करण्यात येणार आहे. दिनांक १४ ऑगस्ट रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये देशभक्तीपर गीते हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.त्यासोबतच पनवेल महानगरपालिका मुख्यालय, नाट्यगृह, विविध महाविद्यालय अन्य सार्वजनिक ठिकाणे या जागी घरो घरी तिरंगा हे सेल्फी बुथ ठेवण्यात येत असून नागरिकांनी आपली छायाचित्रे या सेल्फी बुथ वर काढावीत. आणि ती . वेबसाईटवर अपलोड करावीत तसेच काही ठिकाणी घरो घरी तिरंगा संदर्भात पांढरे कॅनव्हास बोर्ड लावण्यात आले आहेत. त्यावर हर घर तिरंगा घरो घरी तिरंगा अथवा जय हिंद असे वाक्य लिहावे असे ही महापालिकेच्यावतीने आवाहन करण्यात येत आहे.

१५ ऑगस्ट स्वातंत्र दिन मोठ्या उत्साहाने समारंभ पूर्वक साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने घरोघरी कार्यालयामार्फत सार्वजनिक ठिकाणी आपण तिरंगा फडकवावा. महत्वाचे म्हणजे सन २०२१ च्या घटना दुरुस्तीने सामान्य जनतेला ध्वजाच्या प्रतिष्ठेला व सन्मानाला अनुसरून २ ते १५ ऑगस्ट दरम्यान सर्व दिवस आणि प्रसंगी ध्वज प्रदर्शित करण्याची परवानगी दिली आहे. आपल्या राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

# 'रयत'च्या गव्हाण विद्यालयात अवतरले अवकाश

## फिरत्या डोम तारांगणाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन; विद्यार्थ्यांसाठी नाविण्यपूर्ण उपक्रम

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालयात आकाशगंगेची किंबहुना ब्रम्हांडाची रहस्ये, ग्रह ताऱ्यांची स्थिती व गुणवैशिष्ठ्ये आदींची उत्कंठावर्धक अनुभूती देणारी प्रतिकृती अर्थात ' फिरते डोम स्टारबर्स्ट तारांगणा' चे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या हस्ते बुधवारी एम.एन.एम. विद्यालयाच्या सभागृहात झाले.





या वेळी गव्हाण विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन, तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, 'अंजानेया प्लॅनेटेरियम सेंटर 'या संस्थेचे सुरेश जाधव व अमित जाधव शाळा समितीचे सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गवशेठ ठाकूर,गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजयनाना घरत,राहुल घरत, दर्शन ठाकूर,किशोर पाटील, रघुनाथशेठ देशमुख, प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर व सायली वडवलकर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील व प्रणिता गोळे, रयत संस्थेचे लाईफ मेंबर रविंद्र भोईर, विभागप्रमुख संजय उगले, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे,ज्युनिअर कालेज शिक्षक राजेंद्र चौधरी, माणिक घरत, करूणा तांडेल,डॉ.सुवर्णा किर्लोस्कर, जयराम सोनटक्के, अर्चना पाटील, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाचे उपशिक्षक अविनाश कजबजे, राहुल म्हात्रे व दोन्ही विद्यालयाचे सेवक उपस्थित होते.

मुंबईतील वरळीच्या नेहरू तारांगणाच्या धर्तीवर विद्यार्थ्यांना फिरत्या स्टारबर्स्ट तारांगणाच्या माध्यमातून दोन्ही विद्यालयाच्या पाचवी ते बारावी अखेरच्या हजारो विद्यार्थ्यांनी अवकाशातील अनेक खगोलशास्त्रीय रहस्ये, आकाशगंगेतील विस्मयकारक बाबी,ग्रहतारे यांच्या अभ्यास आदींचा प्रत्ययकारी,सुखद आणि विस्मयकारक अनुभव घेतला. या वेळी थ्रीडी स्क्रीन च्या माध्यमातून नील आर्मस्ट्रॉंग याने चंद्रावर पहिले पाऊल टाकतानाचे दृश्य पाहताना अंगावर रोमांच उभे राहिल्याचे इयत्ता दहावी ब या गुरूकुल वर्गाची विद्यार्थीनी सारा घरत वविधिशा कोळी यांनी सांगून हा प्रकल्प अत्यंत आवडल्याची प्रातिनिधिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

हा उपक्रम शालेय विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून विज्ञान, तंत्रज्ञान, गणित आदी विषयांसोबत खगोलशास्त्र व भूगोल या विषयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून अभ्यासाची लालसा निर्माण होईल

**स्टारबर्स्ट तारांगणाचा 'शो '**

लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांचेसह अरुणशेठ भगत, वाय. टी.देशमुख,विजयनाना घरत, अनंताशेठ ठाकूर,विश्वनाथ कोळी, भार्गव शेठ ठाकूर,रघुनाथ देशमुख,राहुल घरत,दर्शन ठाकूर आदी मान्यवरांनी प्रत्यक्ष डोम मध्ये बसून या स्टारबर्स्ट तारांगणाचा 'शो' पाहिला.

पान १ वरुन

## गणेशोत्सवापूर्वी मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा मानस
### -मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

महामार्गाची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, प्रवास करताना नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मुंबई-गोवा महामार्गाचा पाहणी दौरा सुरू असून नागरिकांना आवश्यक सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर राज्य शासनाकडून भर देण्यात येत असून महामार्गाचे काम दर्जेदार झाले पाहिजे आणि लवकर पूर्ण झाले पाहिजे यासाठी निश्चितच प्रयत्न केला जात आहे.

रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी तसेच खड्ड्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यास सुरुवात केली आहे. या माध्यमातून मुंबई-गोवा महामार्ग खड्डेमुक्त करण्याचा तसेच उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. इंदापूर व माणगाव बायपास पुलाच्या निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून या कामासाठी नवीन ठेकदारांची नेमणूक करण्यात आली असून हे काम पूर्ण होण्याकरिता किमान एक वर्षाचा कालावधी लागू शकतो असेही त्यांनी या वेळी सांगितले.

कोकणात जाणारे पर्यायीमार्ग (खोपोली पाली) सुस्थितीत करावेत. इंदापूर, माणगाव येथे जास्तीचा पोलिस बंदोबस्त लावावा. होमगार्डची मदत घ्यावी. मुरूड, अलिबाग जाणाऱ्या नागरिकांसाठी वडखळ अलिबाग रस्त्याची दुरुस्ती करून घ्यावी. गणेशोत्सव हा कोकणातील लोकांचा जिव्हाळ्याचा विषय असून त्यांना प्रवासात कोणत्याही अडचणी येऊ नयेत संबंधित अधिकारी यांना दिलेल्या सूचनांचे पालन करावे यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. गणेशोत्सव काळात मुंबई-गोवा महामार्गावर सुविधा केंद्र उभारुन त्या सुविधा केंद्रावर नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा द्याव्यात. जिथे पुलांची कामे चालू आहेत तेथील सर्विस रोडवर वाहतुक सुरळीत राहतील यासाठी प्राधान्याने कामे पूर्ण करावीत. जिथे गरज आहे तिथे साईन बोर्ड, साईन व्हेजेस, रिफ्लेक्टर बसवावेत.

या पाहणी दौऱ्यात मंत्री भोसले यांनी पळस्पे, जिते पेण, पेण रेल्वे स्टेशन, वाशीनाका, गडब, खारपाले, कोलेटी या विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. या वेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधला. त्यांना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. या समस्या सोडविण्यासाठी सर्वोतोपारी सहाय्य करण्यात येईल असेही त्यांनी या वेळी सांगितले.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या सद्य:स्थितीबाबतची माहिती संगणकीय सादरीकरण द्वारे उपस्थितांना दिली. या पाहणी दौऱ्यावेळी उपविभागीय अधिकारी, तहसिलदार तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला राष्ट्रीय शाळा पुरस्कार




दृढ पाठिंब्याचीदेखील प्रशंसा केली, जी संस्थेच्या सातत्यपूर्ण वाढ आणि यशामागील प्रेरक शक्ती आहे. राष्ट्रीय शाळा पुरस्कार २०२५ समारंभात शाळेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शाळेच्या प्राचार्या राज अलोनी आणि समन्वयक चष्मिंदर कौर बक्षी यांनी हा प्रतिष्ठित सन्मान स्वीकारला. या वेळी अॅड. राहूल घरत उपस्थित होते.

डिजिटल शिक्षण प्रणाली एकत्रित करण्यासाठी चैतन्यशील सह-अभ्यासक्रम कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी मूल्य-चालित संस्कृतीला चालना देण्यासाठी शाळेचे मोठ्या प्रमाणात कौतुक झाले आहे. या टप्प्यात मुख्याध्यापिका राज अलोनी यांचे नेतृत्व महत्त्वाचे ठरले आहे. त्यांचा दूरदर्शी दृष्टिकोन, अथक समर्पण आणि शिक्षणाप्रती समग्र दृष्टिकोन यांनी आरटीपीएस खारघरला राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

## महिलांनी प्रत्येक क्षेत्रात सक्षम व्हावे -अॅड.माधवी नाईक

या कार्यक्रमाला अनेक सामाजिक संस्था, बचत गट आणि महिला मंडळांनी सक्रिय सहभाग घेतला. यामध्ये साईनगर चॅनल उपवन, अभिनव महिला मंडळ, नाच गा घुमा, गार्गीज ग्रुप, जागृती महिला मंडळ, रमाई महिला मंडळ, पनवेल स्मार्ट मॉमीस, स्वयंसहाय्यता महिला मंडळ, जी.एस फाऊंडेशन, जय भवानी महिला मंडळ, एकविरा महिला मंडळ, लहुजी महिला मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ, श्री समर्थ महिला मंडळ यांचा समावेश होते. त्यांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम यशस्वी झाला. दरम्यान, खेळ पैठणीच्या कार्यक्रमात विजेत्या महिलालेला पैठणीसाठी आणि पीएनजीतर्फे सोन्याची नथ आणि इतर स्पर्धकांना विविध आकर्षित बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. तसेच या वेळी लकी ड्रॉ काढण्यात आला असून विजेत्यांनाही आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस चारुशीला घरत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, मोहिनी पाटील, ममता म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश कडू, माजी नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, प्रीती जार्ज, राजेश्री वावेकर, वृषाली वाघमारे, नीता माळी, वर्षा नाईक, सुजाता ठक्कर, शहर सरचिटणीस अमित ओझे, रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रितम म्हात्रे, साधना पाटील, लीना पाटील, समीना साठी, प्रकाशन यमुना यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# ट्रान्सफॉर्मरच्या तारा, आईलची चोरी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायतीचा कार्यान्वित असलेल्या पंप हाऊसच्या २०० के वी व्हॅट क्षमतेच्या विद्युत ट्रान्सफॉर्मर मधील कॉपर तारा व आईल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. कोल्हारे ग्राम पंचायतीकडून नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरटयांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

कोल्हारे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील धामोते, भोपेले आदी भागात पाणीपुरवठा करण्यासाठी धामोते गावाजवळील उल्हास नदी पात्रातील पाण्याच्या विहिरीतील कार्यान्वित असलेल्या पंपासाठी विद्युत पुरवठा करणारा २०० के वी व्हॅट क्षमतेच्या विद्युत ट्रान्सफॉर्मर हा बसविण्यात आला आहे. परंतु बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी सकाळी ५.०० वाजण्याचे सुमारास पंप सूरू करण्यासाठी कोल्हारे ग्रामपंचायतीचा कर्मचारी विकास पेरणे हे गेले असता, विद्युत ट्रान्सफॉर्मर हा दगडी कट्यावरून खाली उतरवल्याचा व त्यामधील कॉपर तारा व साधारण ८० ते ९० लिटर आईल हे काढून चोरून नेल्याचे निदर्शनास आले.

सदर घटने संदर्भातील माहिती कोल्हारे ग्रामपंचायतीचे सरपंच महेश विरले व ग्रामविकास अधिकारी संजय राठोड यांना दिली अज्ञात चोरटयांच्या विरोधात .नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरटयांचे विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# 'काँग्रेसने महाराष्ट्राच्या मतदारांचा अपमान बंद करावा'

**मुंबई - प्रतिनिधी**

काँग्रेस आणि विरोधकांनी महाराष्ट्राच्या मतदारांचा सातत्याने चालवलेला अपमान बंद करावा, जर निवडणुकांवर टिकाच करायची असेल तर प्रथम विधानसभेचा राजीनामा द्यावा, असे सडेतोड प्रच्युत्तर भाजपाचे मुंबई अध्यक्ष आणि राज्याचे सांस्कृतिक कार्य तथा माहिती तंत्रज्ञान मंत्री आशीष शेलार यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना दिले आहे. लोकांनी मतपेटीतून दिलेला जबरदस्त धक्का कॉन्ग्रेस आणि माविआला पचवता आलेला नाही असा टोलाही त्यांनी लगावला.

आज राहुल गांधींच्या पत्रकार परिषदेनंतर लगेच पत्रकार परिषद घेत ना. आशीष शेलार यांनी राहुल गांधींनी कैलेल्या टिकेला जोरदार प्रत्युतर दिले. यावेळी बोलतांना आशीष शेलार यांनी काँग्रेस आणि विरोधकांच्या दुटप्पी भूमिकेचाही समाचार घेतला.



आता मतदार याद्यांवर आणि मतदान प्रक्रियेवर गळे काढणाऱ्या विरोधकांनी, विशेषतः काँग्रेसने प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध झाल्यावर त्यावर आक्षेप घेतला नव्हता याकडेही ना. आशीष शेलार यांनी बोट ठेवले. ते म्हणाले की निवडणुक आयोग त्यांची बाजू मांडेल परंतु जेव्हा मतदार याद्या आक्षेपांसाठी प्रारूप याद्या जाहिर झाल्या तेव्हा विरोधकांनी काहीच केले नाही. तेव्हा केवळ ३९०० आक्षेप दाखल झाले होते त्यातील केवळ ९८ आक्षेप वैध ठरले होते अशी माहितीही माझ्याकडे आहे, असे त्यांनी सांगितले.

माविआ आणि काँग्रेस जे सांगत आहेत की शेवटला मतदान वाढले, त्यांनी दिवसभराची दर तासाची आकडेवारीही सांगावी, .जास्तीत जास्त लोकांनी मतदान करावे असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते, त्यानुसार लोकांनी अधिकाधिक संख्येने मतदान केले यात चुक काय असे शेलार यांनी विचारले.

**खालिद का शिवाजी कान्सच्या नोंदीतूनही वगळणार**

खालिद का शिवाजी हा चित्रपट जनभावना दुखावणार व इतिहासाचे विकृतीकरण करणारा असल्याने तो कान्स महोत्सवाच्या नोंदीतूनही वगळला जावा यासाठी कायदेशीर प्रसासकीय प्रक्रिया सुरू केली आहे, असे आशीष शेलार यांनी सांगितले. राज्य सरकार याविषयात शिवप्रेमींच्या व इतिहास अभ्यासकांच्या सोबत असून जनभावना दुखवू देणार नाही आणि इतिहासाची मोडतोड सहन करणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# रोह्यातील भाजप जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**धाटाव : प्रतिनिधी**

आमदार नसलो तरी जनतेचे प्रश्न प्रशासनासमोर मांडण्याचा अधिकार मला असल्याचे माजी आमदार पंडित पाटील यांनी गुरुवारी रोह्यात आयोजीत भाजपा जनता दरबारात प्रतिपादन केले


यावेळी त्यांनी जनता दरबार बद्दल अनेकांनी विविध मते अनेक माध्यमातून व्यक्त केली. मी माजी आमदार असून मला प्रशासकीय अधिकाऱ्यांना बोलवून जनता दरबार घेण्याचा अधिकार नसल्याचे अनेकांचे मत होते.मी आता माजी आमदार आहे याची मला जाणीव आहे पण मी आता भाजपा मध्ये प्रवेश केला आहे. आज देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी तर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्वाखाली महायुती सरकार आहे. त्यामुळे जरी अधिकारी जनता दरबारात उपस्थित नाही राहिले तरी काहीही फरक पडत नाही.

सार्वजनिक बांधकाम विश्रामगृह येथे तालुका भाजपाच्यावतीने आयोजित या जनता दरबार प्रसंगी राजेश सानप,नितीन तेंडुलकर, जितेंद्र जोशी, लियाकत खोत, रोशन चाफेकर, नरेश कोकरे, नंदेश यादव,कृष्णा बामणे सरचिटणीस, रविंद्र तारु, रिया कासार महिलाअध्यक्ष,यज्ञेश भांड, मृणालपेंडसे,शैलेश रावकर,सनलकुमार,तनवी गुरव,आदिती शिंदे,राजश्री सानप,सीमा महाबळे , नलेश धुमाळ, दीपक मोरे उपस्थित होते.

# ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम यांना मुंबई मराठी पत्रकार संघाचा आचार्य अत्रे पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघाकडून देण्यात येणार्या प्रतिष्ठेच्या आचार्य अत्रे पुरस्कारासाठी यंदा ज्येष्ठ पत्रकार तथा मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष कुमार कदम यांची निवड झाली आहे. आचार्य अत्रे यांच्या कन्या श्रीमती शिरीष पै यांनी दिलेल्या देणगीतून हा अत्यंत प्रतिष्ठेचा असा पुरस्कार आचार्य अत्रे यांच्या जयंतीनिमित्त दिला जातो. शाल, श्रीफळ, रुपये ११,०००/-,आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



वृत्तपत्र क्षेत्रातील एकूण ५४ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव गाठीशी असलेल्या कुमार कदम यांनी विद्यार्थी दशेत असतानाच आपल्या पत्रकारितेचा श्रीगणेशा केला होता.रत्नागिरी जिल्ह्यातून प्रसिद्ध होणार्या 'रत्नभूमि' या दैनिकातून १९७२ मध्ये त्यांच्या पूर्णवेळ पत्रकारितेचा आरंभ झाला. याच काळात 'साप्ताहिक मार्मिक'मधून महापालिकेत 'एक नजर' हे सदर त्यांनी अनेक वर्षे चालविले. सलग १३ वर्षे स्तंभलेखक म्हणून त्यांनी सातत्यपूर्ण लिखाण केले.

दूरदर्शनवर मराठी कार्यक्रमाची होणारी गळचेपी रोखण्यासाठी १९८३ साली मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष असताना त्यांनी मंत्रालयावर मोर्चा काढला होता सध्या ते सामाजिक स्तरावर अवयवदान विषयक जनजागृती करण्याचे राज्यस्तरावर व्यापक काम करत आहेत.

## निवडक

### टेम्पोच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

**पनवेल :** आयशर टेंपोने मोटरसायकलला दिलेल्या धडकेत मोटरसायकल वरील वसंत जनार्दन लबडे (वय ४७) यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी आयशर टेम्पो (एमएच १६ सीई ५२५५) वरील चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरिवली येथील वसंत जनार्दन लबडे हे ड्युटीसाठी जात होते. कसळखंड गावाच्या पुढे रसायनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर आले असता चारचाकी आयशर टेम्पोवरील वाहनचालकाची त्यांच्या मोटरसायकलला धडक दिली. अपघातात वसंत लबडे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत.

### पनवेलमधून स्कूटीची चोरी

**पनवेल :** शहरातील आर्या बार हॉटेल जवळ उभी करून ठेवलेली स्कूटी गाडी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. सुरेशचंद गौतम यांनी त्यांची २५ हजार रुपये किमतीची काळी होंडा कंपनीची ॲक्टीव्हा स्कूटी (एमएच-४६-एव्ही-५०५७) ही आर्या बार हॉटेलजवळ उभी ठेवली होती. याचवेळी अज्ञाताने ही गाडी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ट्रांसफार्मरमधील ऑइलची चोरी

**पनवेल :** चोरांनी ट्रान्सफॉर्मर मधील ऑईलची चोरी केल्याने ऑईलची पातळी कमी झाली आणि ट्रांसफार्मर मधील तीन कॉपर कॉइल्स जळून नुकसान झाल्या प्रकरणी चोराविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कळंबोली येथील ट्रांसफार्मर मधील ऑइल चोरी झाल्याने त्यांची पातळी कमी झाली आणि ते जळाल्याचे महावितरणच्या कर्मचाऱ्यांना दिसले. पाहणी केली असता चोराने ४०० लिटर ऑइलची चोरी केली. त्यामुळे कॉपर कॉइल जळाले.

### टॉवरमध्ये साहित्याची चोरी

**पनवेल :** जिओ कंपनीच्या मोबाईल टॉवरमधील तीन लाख नऊ हजार रुपयांच्या इलेक्ट्रॉनिक साहित्याची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात खारघर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर हिरानंदानी ब्रिजवर लावण्यात आलेल्या जिओ कंपनीच्या मोबाईल टॉवर परीक्षण करण्याकरता अधिकारी आले असता टॉवरमध्ये इलेक्ट्रॉनिक साहित्य आढळले नाही. अज्ञाताने इलेक्ट्रॉनिक साहित्य चोरून नेले.

### फुगे विकणारी मुलगी बेपत्ता

**पनवेल :** फुगे विकणारी १५ वर्षीय मुलगी बेपत्ता झाल्याने तीचे अपहरण केल्याचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. जयराम वाघरीया हे मागील आठ दिवसांपासून पनवेल मध्ये राहत आहेत. त्यांचा फुगे आणि झाडू विकण्याचा व्यवसाय आहे. त्यांची मुलगी पटेल हॉस्पिटलकडे जाणारे रस्त्याने पुढे निघून गेली. तिची वाट पाहिली मात्र ती आली नाही. तिचा परिसरात शोध घेतला मात्र ती सापडली नाही. तिचे अपहरण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# नागरिकांनी मोदी सरकारच्या योजनांचा लाभ घ्यावा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; पनवेल रोजबाजार येथे कल्याणकारी शिबिर





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रातील मोदी सरकार हे विविध कल्याणकारी योजना नागरीकांसाठी राबवत आहे. या योजनांचा लाभ नागरीकांनी घ्यावा तसेच आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर ठाकूर यांनी रोजबाजार येथे आयोजीत करण्यात आलेल्या करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिर आणि कल्याणकारी योजनांच्या शिबिरावेळी केले. तसेच आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या शिबिराचे उद्घाटन डॉ. गिरीश गुणे यांच्या हस्ते यांच्या हस्ते झाले.

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमीत्त सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार भारतीय जनता पक्ष कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत आणि पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या वतीने विविध कल्याणकारी योजना तसेच महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी, मोफत आरोग्य मुल्यमापन तसेच प्रधानमंत्री श्रमयोगी पेन्शन योजना, राष्ट्रीय वयोश्री योजना, आयुष्मान भारत योजना, तसेच ज्येष्ठ नागरीक कार्ड योजनेचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याहस्ते झाले. या कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपीळे, डॉक्टर गिरीश गुणे, वर्षा ठाकूर, भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, अमरीश मोकल, पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत, प्रितम म्हात्रे, सपना पाटील, लिना पाटील, कामगार मोर्चाचे उपाध्यक्ष अनिल खोपडे आदी उपस्थित होते.

दरम्यान, या कार्यक्रमामध्ये ५४ महिलांची कॅन्सर तपासणी, १०५ जणांचे आरोग्य मूल्यमापन करण्यात आले तसेच २७ जणांनी प्रधानमंत्री श्रमजीवी योजना, ८४ जणांनी इंदिरा गांधी नॅशनल पेन्शन योजना तर ४७ जणांनी आयुष्यमान भारत योजनेचे फॉर्म भरले.

# खारघर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभेचे कार्यसम्राट आमदार श्री. प्रशांतदादा ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त, शिवतेज मित्र मंडळ, खारघर यांच्या वतीने तसेच आमदार प्रशांत ठाकूर साहेबांच्या सहकार्याने, दुर्गामाता मंदिर, सेक्टर १२, खारघर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



नागरिकांच्या आरोग्यविषयी जागरूकता वाढवण्यासाठी व प्राथमिक तपासणीसाठी उपयुक्त ठरलेला हा उपक्रम अत्यंत सकारात्मक वातावरणात पार पडला. रक्तदाब व मधुमेह तपासणी, हृदयविकार आणि जनरल चेकअप, महिलांसाठी विशेष आरोग्य सल्ला सेवा या तपासण्या शिबिरामध्ये करण्यात आल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवतेज मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते, विशेषतः महिला कार्यकर्त्यांनी अतिशय मेहनत घेतली आणि नियोजनबद्ध कार्य करून उपक्रमात योगदान दिले.

पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे, जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, खारघर भाजपचे सरचिटणीस दीपक शिंदे या मान्यवरांनी शिबिराला भेट देऊन उपस्थित कार्यकर्त्यांचे व वैद्यकीय पथकाचे कौतुक केले तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. शिवतेज मित्र मंडळातर्फे आमदारसाहेबांच्या समाजकार्यातील सातत्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली व येणाऱ्या काळातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प करण्यात आला.

# सेंट्रल पार्कमध्ये वृक्षारोपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अटल फाउंडेशन व जागृत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खारघर सेंट्रल पार्क येथे वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात विविध प्रकारची शोभिवंत व सावली देणारी झाडे लावण्यात आली. स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व फाउंडेशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यावरण संवर्धन व हिरवळ वाढविण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याची शपथ घेण्यात आली. अटल फाउंडेशन व जागृत फाउंडेशनचे पदाधिकारी यांनी सांगितले की, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रेरणेतून समाजोपयोगी कार्ये अधिक जोमाने राबवली जातील. या उपक्रमामुळे सेंट्रल पार्कचे सौंदर्य अधिक खुलणार असून नागरिकांसाठी शुद्ध हवा व पर्यावरणाचे संरक्षण साधले जाईल.

या कार्यक्रमास अटल फाउंडेशनचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल, जागृत फाउंडेशनचे अध्यक्ष ज्ञानेश्वर खरपूरिया, सचिव शिवमसिंह, जंदरभान, ललित चौधरी, रंजन शर्मा, दिनेशजी, चेतलाल, शैलेश पटेल, दिलीप पटेल आदी उपस्थित होते.



# 'एमएनएम'च्या विद्यार्थ्यांची रामशेठ ठाकूर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला क्षेत्रभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरु नारायण म्हात्रे व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राथमिक विभागाची आधुनिक क्रीडा सुविधांनी सुसज्ज, नयनरम्य, अद्ययावत, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. शाळेतील ९२ विद्यार्थ्यांनी क्षेत्रभटीमध्ये सहभाग घेतला.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कल्पनेतून, प्रयत्नातून साकार झालेल्या रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील सुविधांची विद्यार्थ्यांनी माहिती घेतली.



मुख्याध्यापिका सायली वडवलकर पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी विद्यार्थ्यांना सहलीच्या शुभेच्छा दिल्या. प्राथमिक विभागाच्या शिक्षिका हर्षदा घरात, चैताली कोळी यांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रयत्न घेत सहलीत सहभाग घेतला.

# आगामी सणांसाठी भाजयुमोची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अगामी रक्षाबंधण सण आणि देशाच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त हर घर तिरंगा मोहिम भाजपच्या वतीने राबवण्यात येणार आहे. त्यापार्श्वभुमीवर भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगडची जिल्हा नियोजन बैठक गुरुवारी आयोजीत करण्यात आली होती. श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात ही बैठक जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या अध्यक्षतेखाली झाली असून या बैटकीत या अभियानांच्या आयोजनासंदर्भात चर्चा करण्यात आली.

या बैठकीत दोन्ही उपक्रमांचे प्रभावी नियोजन, जनतेचा सक्रिय सहभाग, भाजयुमो कार्यकर्त्यांची भूमिका, तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून होणारा व्यापक प्रचार यावर सखोल चर्चा करून अभियानांची व्यापकता वाढवण्यासाठी अनेक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



भाजयुमो उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस अभिषेक संजय भोपी यांनी प्रस्तावना सांगितली. भाजयुमो उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर यांनी दोन्ही उपक्रमांबाबत विचार मांडले. भाजप रायगड जिल्हा प्रभारी सुनील राणा, भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील व भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी सविस्तर मार्गदर्शन करत दोन्ही उपक्रमांच्या यशस्वी नियोजनासाठी प्रभावी सूचना दिल्या.

या वेळी माजी नगरसेवक तेजस कांडपीळे, अभिषेक भोपी, पनवेल ग्रामिण अध्यक्ष आनंद ढवळे, रोहित जगताप, विवेक होन, खारघर अध्यक्ष नितेश पाटील, धीरज ओवळेकर, कळंबोली अध्यक्ष गौरव नाईक, देवांशू प्रभाळे, भूषण जळे, संजोग शेळके, नितेश घुगे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाविद्यालयात पोस्टर सादरीकरण स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.६) वनस्पतीशास्त्र विभागातर्फे प्रथम वर्ष बी.एस्सी. विद्यार्थ्यांसाठी पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन केले.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश भारतीय ज्ञान प्रणालीचा इंडियन नॉलेज सिस्टमचा विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य, संगीत, साहित्य आणि वास्तुकला या विविध क्षेत्रांमध्ये असलेला महत्त्वाचा वाटा विद्यार्थ्यांना समजावून देणे हा होता. या सादरीकरणामध्ये एकूण २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला



तसेच त्यांनी विविध विषयांवर अभ्यास करून आकर्षक आणि माहितीपूर्ण पोस्टर्स तयार केली. विद्यार्थ्यांनी भारतीय पारंपरिक ज्ञान, आयुर्वेद, योगशास्त्र, भारतीय संगीत, प्राचीन वास्तुकला आणि तंत्रज्ञानातील योगदान यावर आधारित सादरीकरणे केली.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती निर्माण करणारा आणि भारतीय ज्ञान परंपरेची वैज्ञानिक बाजू समजून घेण्यास मदत करणारा ठरला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच महाविद्यालयातील इतर सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# खांदा कॉलनीतील समस्यांबाबत बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी रहिवाश्यांना होत असलेल्या त्रासाबद्दल बैठक झाली. यात कॉलनीमधील सर्व अडचणी आणि समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. वाहतूक विभागाचे व पोलीस निरीक्षक अजय भोसले यांनी लिखित सूचना मागविल्या आहेत. या वेळी सर्व शाळांचे प्रतिनिधी हॉलचे मालक वाइन शॉपचे मालक हजर होते. त्यांना सूचना दिल्या.



या बैठकीला माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, माजी उपमहापौर सीताताई पाटील, भाजपा नवीन पनवेल शहर मंडळ उपाध्यक्ष गोपीनाथ मुंढे, मार्केटचे अध्यक्ष अनिलमामा बंडगर, जयंत भगत, युवा नेते सचिन गायकवाड, संजय कांबळे, नामदेव कोरे, दीपक जांभळे, प्रकाश खानावकर,चंद्रकांत सोनवणे, राजू महापूरकर, विक्रम मोरे, युवराज बेडसे, सचिन नागतिलक मधुरा भोसले, आझाद ज्येष्ठ नागरिक संघटनेचे पदाधिकारी साईनंदन हॉलचे मालक सुरेंद्र शेट्टी आणि रवी शेट्टी श्रीकृपा हॉलचे मालक चंदन शेठ, संस्मरण हॉलचे मालक दुधुसकर, आनंदी ग्रुपचे सदस्य थोरात आणि कॉलनीमधील इत्तर रहिवाशीउपस्थित होते. अशी माहिती भाजप नवीन पनवेल शहर मंडळ सरचिटणीस भीमराव पोवार यांनी दिली.

# वाहतुकीचे नियम पाळणाऱ्या महिलांना द्वारकादास शामकुमारतर्फे साडी भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाहतुकीचे काटेकोरपणे नियम पाळणाऱ्या महिलांना साडी देऊन पनवेलच्या द्वारकादास शामकुमार या साडी शोरूमच्यावतीने सन्मानित करण्यात आले. पनवेल शहरात झालेल्या या सामाजिक उपक्रमास महिलांना मिळालेल्या साडीच्या सरप्राईज भेटीने महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.



या वेळी द्वारकादास शामकुमारचे संचालक शरद पाटील,माजी नगरसेविका नीता माळी, डॉ.सुरेखा मोहोकर,सारिका भगत,महिला पोलीस हवालदार किरण भाटकर, महिला पोलीस शिपाई अंजना पवार, महिला पोलीस शिपाई अर्चना फडतरे, पोलीस हवालदार गोटू पवार उपस्थित होते.

द्वारकादास शामकुमार या साडी शोरूमतर्फे महाराष्ट्रभर ७० हून अधिक शाखांमधून हा उपक्रम राबविला जात आहे. यापूर्वीही विविध माध्यमातून प्रत्येक ठिकाणी सामाजिक उपक्रम राबविले गेले आहेत. द्वारकादास शामकुमार या साडीच्या शोरूमने आतापर्यंत सामाजिक कार्यात नेहमीच सहभाग घेतला आहे यापुढेही असे सामाजिक उपक्रम राबवले जातील असे द्वारकादास शामकुमारचे संचालक शरद पाटील यांनी सांगितले.

आपली गाडी चालवत असताना वाहतुकीच्या नियमांचे पालन स्वतःचे रक्षण करण्यासाठी उचललेले हे एक पाऊल असून वाहतुकीच्या नियमांचे पालन केले तर स्वतःची सुरक्षा निश्चित केली आणि त्याचबरोबर दुसऱ्यांसाठी इतरांसाठी एक प्रेरणादायक आदर्श तुम्ही निर्माण केला आहे. या रक्षाबंधनाला स्वतःसाठी दिलेले हे वचन खरं रक्षणाचा प्रतीक ठरते. त्याचबरोबर शहर वाहतूक सुलभतेसाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आपण करीत असलेल्या कार्याला सलाम करत नागरिकांच्यावतीने द्वारकादास शामकुमारवतीने वाहतूक पोलिसांचे आभार मानले.या उपक्रमास पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांचे सहकार्य लाभले.

## संपादकीय

# ही कशाची किंमत?

साधारण २०१० पासून उत्तराखंडमधील नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे असे यासंदर्भातील अभ्यासातून समोर आले आहे. तेव्हापासून अनेक आपत्तींमधून येथे निसर्गात अक्षम्य मानवी हस्तक्षेप झाल्याचे व त्याची किंमत चुकवावी लागत असल्याचे वारंवार दिसते आहे. वाढलेल्या पर्यटनातून उत्पन्न व महसूल वाढल्याचा आनंद आहेच. पण निसर्गाच्या विनाशाचे काय, असा प्रश्न आता उत्तराखंडवासीयांना पडतो आहे.

**उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथील धराली गावात अकस्मात आलेला पुराचा भयावह लोंढा वृत्तवाहिन्यांवरून अवघ्या देशाने पाहिला. या लोंढ्यामुळे धराली गावाचा निम्मा भाग चिखलात गेला असून अनेक इमारती व घरे वाहून गेली आहेत. हिमालयीन पर्वतराजीत वसलेल्या उत्तराखंडसारख्या राज्यात पारंपरिक घरे डोंगर उतारावर बांधली जातात. पण मंगळवारच्या पुरात वाहून गेलेली घरे ही थेट नदीपात्राच्या आसपास, पुराच्या वाटेतच होती. सुमारे तीन डझन हॉटेले, अनेक होमस्टे आणि दुकानांना या पुराचा मोठा फटका बसला आहे. येथून अवघ्या वीस किलोमीटरवर गंगोत्री आहे. त्यामुळे एरव्ही नदीजवळच्या या हॉटेलांना व घरगुती निवासाच्या पर्यायांना पर्यटकांची मोठी पसंती असे. परंतु मंगळवारी अकस्मात आलेल्या पुरामुळे होत्याचे नव्हते झाले. मदत आणि बचावकार्याचा प्रयत्न सुरू असला तरी पाऊस आणि अनेक ठिकाणी झालेल्या भूस्खलनामुळे त्यात अडथळे येत आहेत. आतापर्यंत सहा मृतदेह हाती लागले असून सुमारे शंभरहून अधिक जण बेपत्ता असल्याचे सांगितले जाते. घटना घडली त्यावेळी परिसरात जेमतेम ६.५ मिमी पाऊस झाला होता. त्यामुळे इतक्या कमी पावसामुळे पूर कसा येऊ शकतो असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे. धरालीची नैसर्गिक आपत्ती ही हिमस्खलनामुळे घडली असावी अशी शक्यता व्यक्त होते आहे. उत्तराखंडमध्ये १२०० हून अधिक हिमनद्या असून हिमनदीतील हिमतलाव पावसामुळे फुटून देखील असा पूर येऊ शकतो. अशा नैसर्गिक आपत्तीवर मानवी नियंत्रण शक्य नाही. परंतु नदीपात्रानजीक हॉटेले व घरांचे अतिक्रमण नसते तर जीवितहानी टाळता आली असती. साधारण २०१० पासून उत्तराखंडमधील नैसर्गिक आपत्ती वाढल्याचे दिसते आहे. २०१३ मध्ये केदारनाथ परिसरात २४ तासांत ३०० मिमीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने चोराबाडी तलावाचे नैसर्गिक बांध फुटून पूर आला होता. त्यात सुमारे ५७०० लोकांचा मृत्यू झाला होता. साठच्या दशकात येथील चारधाम तीर्थक्षेत्रे व पर्यटनस्थळांना सुमारे दोन लाख पर्यटक भेट देत असत असे काही नोंदींवरून दिसते. गेल्या वर्षी येथील महामार्गाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असता सुमारे १४ लाखांहून अधिक पर्यटकांनी बद्रीनाथला तर १६ लाखांहून अधिक लोकांनी केदारनाथला भेट दिली. पर्यटनातून मिळणारे उत्पन्न, सरकारदरबारी जमा होणारा महसूल याचा स्थानिकांना आनंद वाटणे स्वाभाविकच आहे. परंतु पर्यटकांच्या प्रचंड वाढलेल्या संख्येमुळे येथे येणाऱ्या मोटारी व बसगाड्यांची संख्याही अफाट वाढली आहे. त्यामुळे जंगले तोडून रस्तारुंदीकरण करणे भाग पडले आहे. डोंगरमाथ्यांवर, नद्यांच्या पात्रांनजीक, जिथे पहावे तिथे हॉटेलांच्या इमारतींची बांधकामे उभी राहिली आहेत. गढवाल, सिमला, मंडी सगळीकडे हेच चित्र आहे. परंतु डोंगर, जंगले पोखरून केलेल्या या कथित विकासामुळे येथे दरडी कोसळण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अनेक नैसर्गिक आपत्ती या मानवनिर्मित असतात हे एव्हाना सगळ्यांनाच कळून चुकले आहे. यातून उत्तराखंडनेच नव्हे तर सगळ्यांनीच धडा घेण्याची गरज आहे.**

# बंदीकाळातील मासेमारी रोखण्याचे आव्हान



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

पावसाळ्यात समुद्र खवळलेला असतो. त्यामुळे १ जून ते ३१ जुलै (पूर्वी हा कालवधी १५ ऑगस्ट किंवा नारळी पौर्णिमा असा असायचा) या कालावधीत खोल सामुद्रात मोसेवारी करण्यास बंदी घातली जाते. तरी देखील काही लोक या बंदी कालवधीत देखील मासेमारी करण्यासाठी खोल समुद्रात जातात. अनेक वेळा छोटेमोठे आपघात घडतात. अलिबागजवळच्या समुद्रात मासेमारी नौकेला जलसमाधी मिळून तीन खलांशाना आपला जीव गमवावा लागला. उरण तालुक्यातील मोरा बंदराजळ एक बोट बुडून एकाचा मृत्यू झाला. या दोन दुर्घटनेनंतर बंदी कालावधीत चालणारया बेकायदा मासेमारीचा मुद्दा चर्चेत आला आहे. बंदी काळात खोल समुद्रात होणारी आवैध मासेमारी रोखणे हे एक प्रशासनासमोर मोठे आव्हान आहे. बंदीकाळात मासेमारी रोखण्याची जबाबदारी मत्स्यव्यवसाय विकास विभागावर येते. त्यांच्याकडे पुरेस मनुष्यबळ नाही. त्यामुळे मत्स्यव्यवसाय विभाग तटरक्षक दल , नौदल व पोलीस दलाने देखील यात लक्ष घातले पाहिजे.करण कवेळ मासेमारी नाही तर इतरी बाबी त्यात आहेत.

मत्स्यव्यवसाय विकास विभागातील कर्मचार्यांच्या म्हणण्यानुसार बंदी कालावधीतील हे दोन महिन्याचे काम मोठे जिकीरीचे असते. रात्रंदिवस गस्त ठेवावी लागते. परंतु खात्याकडे काम करायला पुरेसा कर्मचारी वर्गच नाही. जे कार्यालयीन काम करतात त्यांनाच अनेकदा रात्रीची गस्त करावी लागते. १२० किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभलेल्या रायगड जिल्हयात लहान मोठया जवळपास साडेचार हजार मच्छीमार नौका आहेत. मासळी उतरवण्यासाठी ४५ ठिकाणे आहेत. या ठिकाणांवर नजर ठेवण्यासाठी केवळ तीनच परवाना अधिकारी कार्यरत आहेत. मत्स्यव्यवसाय विकास विभागात रायगड जिल्हयासाठी ३९ पदे मंजुर आहेत त्यापैकी केवळ १९ पदे भरलेली आहेत तर २० पदे रिक्त आहेत. १९८१ मध्ये या खात्याची पदरचना झाली ती आजतागायत तशीच आहे. मागील जवळपास ४५ वर्षात या खात्यावरील कामांची जबाबदारी वाढली. मच्छीमार बोटींची संख्या वाढली. जेटींची संख्या वाढली तरीदेखील पदरचना पूर्वीप्रमाणे आजही कायम आहे.

या विभागाकडून समुद्रात दिवसरात्र गस्त सुरू असते. विशेषतः बंदी कालावधीत विशेष लक्ष ठेवावे लागते. परंतु या विभागाकडे जेमतेम एकच गस्तीनौका आहे. परंतु त्यावर मनुष्यबळच नाही. कार्यालयीन कर्मचारी पाळी लावून या नौकेवर गस्तीसाठी जात असतात. अनेकदा मुंबई किंवा रत्नागिरी जिल्ह्याच्या गस्तीनौकांची मदत घ्यावी लागते. अवैध मासेमारीवर कारवाई करत असताना अनेकदा वादाचे प्रसंग उदभवतात. कर्मचारयांचया जीवाला धोका असतो.अशावेळी दोन हत्यारबंद पोलीस शिपाई मिळावेत अशी विनंती पोलीस विभागाकडे करण्यात आली आहे. परंतु त्याला अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही.



समुद्रात बेपत्ता मच्छीमार बोटींचा शोध घेण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाला अद्यावत ड्रोन पुरवण्यात आले आहेत. या ड्रोनचा वापर बेकायदा मासेमारीवर कारवाईसाठी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु हे ड्रोन चालवण्यासाठी खात्याकडे कर्मचारीच उपलब्ध नाहीत. खाजगी संस्थेच्या माध्यमातून ड्रोन उडवले जात आहेत. बंदी कालावधीत मासेमारी करणारयांवर दंडात्मक कारवाई बरोबरच त्याचा परवाना रद्द करणे, इंधन सबसिडी बंद करणे विमा कवच न देणे अशाप्रकारे कारवाई करण्याची तरतूद आहे. कमी मनुष्यबळ असताना देखील यंदाच्या हंगामात या विभागाने अवैध मासेमारीच्या ३९ कारवाई केल्या आहेत. त्यात ८ बोटी जप्त करण्यात आल्या असून २९ लाखांची दंडवसुली करण्यात आली आहे. यातील ९ कारवाया ड्रोन सर्व्हेक्षणातून तर २७ कारवाया गस्तीनौकांच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत.

अवैध मासेमारीवर कारवाई करण्याची जबाबदारी जशी मतस्यव्यवसाय विभागाची आहे तशी ती मचछीमार सोसायटयांचीदेखील आहे. परंतु काही सोसायटया ही जबाबदारी पाळत नाहीत त्यातून अशा दुर्घटना घडत असतात. अलिबाग समुद्रात दुर्घटना ग्रस्त झालेल्या तुळजाई बोटीचे मालक हे उरणमधील करंजा मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्थेशी संलग्न आहेत. या सोसायटीला यापूर्वीदेखील अनेकदा समज देण्यात आली. या सोसायटीवर कारवाई करण्याबाबत सहकार विभागाला देखील सुचित करण्यात आले आहे. मच्छीमार सोसायट्यांनी देखील आपली जाबाबदारी पाळली पाहिजे.

बंदी कालावधीत मासेमारीसाठी समुद्रात जावू नये यासाठी आमच्या वि भागातर्फे मच्छीमारांचे प्रबोधन केले जात असते. सर्व मच्छीमार संस्थांकडे पत्रव्यवहार केला जातो. त्यांच्या प्रति नि धींची बैठक घेवून बंदी काळात मासेमारी करणे कसे चुकीचे आहे हे समजावून सांगितले जाते. वर्षानुवर्षे हे चालत आले आहे. परंतु त्याकडे दर्लक्ष केले जाते. पूर्वीच्या तुलनेत हे प्रमाण खूपच कमी झाले आहे. मत्स्यव्यवसाय विभागाकडे मनुष्यबळ कमी आहे.या विभागाला अत्याधुनिक सुविधा दिल्या पाहिजे. अँडींगपॉईटवर पोलीस गस्ती ठेवली पाहिजे. समुद्रातील हालचालींवर तटरक्षक दल व नौदलाने लक्ष ठेवले पाहिजे. सर्व विभागने समन्वयाने काम केले आणि मच्छीमारांनी काद्याचे पालन केले तर बंदीकाळातील अवैध मासेवामारीला आळा बस ूशकेल.

## बदलते तंत्रज्ञान

# जगातील पहिली एअरबाईक डिझेलवरही उडेल


पोलंडची कंपनी व्होलोनॉटने एक नवीन एअरबाईक तयार केली आहे, जी २०० किमी प्रतितास वेगाने हवेत उडू शकते. विशेष म्हणजे ती ४ प्रकारच्या इंधनाने उडवता येते. यामध्ये डिझेल, बायोडिझेल, जेट-ए१ आणि केरोसिनचा समावेश आहे. कंपनीने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर त्याचा व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये टेक-ऑफ आणि लँडिंग दाखवले आहे. एअरबाईक टॉमाझ पॅटन यांनी तयार केली आहे, ज्यांनी जेटसन वन सारख्या इलेक्ट्रिक फ्लाइंग मशीन तयार केल्या आहेत. ते म्हणतात की, ही एक वास्तविक जगातील स्पीडर बाईक आहे, जी हवेत वेगाने उडू शकते आणि कुठेही जाऊ शकते.



एअर बाईकची किंमत ८.८० लाख (सुमारे ७.३७ कोटी रुपये) आहे. त्याचे फक्त काही युनिट्स बनवले जातील. एअर बाईक १ ऑगस्ट २०२५ पासून कंपनीच्या अधिकृत वेबसाइट वरून बुक करता येईल. सध्या ती फक्त प्रोटोटाइप टप्प्यात आहे, ती बाजारात कधी येईल याची तारीख निश्चित केलेली नाही.ही एक सिंगल-सीटर फ्लाइंग बाईक आहे, जी सायन्स-फिक्शन चित्रपटांमधील स्पीडर बाईकसारखी दिसते. तिची बॉडी कार्बन फायबरपासून बनलेली आहे आणि ती ३ऊ प्रिंटिंगद्वारे बनवली आहे. यामुळे ती हिरो स्प्लेंडर मोटरसायकल (१२० किलो) पेक्षा ४ पट हलकी होते. तिचे वजन फक्त ३० किलो आहे आणि ती ९५ किलो पर्यंत वजन वाहून नेऊ शकते. त्यावर रायडरला ३६०-अंश ओपन व्ह्यू मिळतो, जो एक वेगळा रायडिंग अनुभव देतो.

फ्लाइट संगणक आणि स्थिरीकरण प्रणालीसह नियंत्रण हे जेट टर्बाइन वापरते, ज्यामध्ये फिरणारे प्रोपेलर नसतात, जे ते अद्वितीय बनवते. जेट टर्बाइन हे एक प्रकारचे इंजिन आहे, जे एअरबाईकला हवा वेगाने ओढून आणि बाहेर काढून हवेत उडण्याची शक्ती देते. हे सहसा विमानांमध्ये वापरले जाते. त्यात दोन जेट टर्बाइन आहेत, म्हणजे जर एक बिघडले तर दुसरे काम करेल. यामुळे अपघाताची शक्यता कमी होते फ्लाइट कॉम्प्युटर आणि स्टेबिलायझेशन सिस्टम सोपे नियंत्रण प्रदान करते, जे ड्रोनसारखे काम करते. ते जास्तीत जास्त १० मिनिटे हवेत राहू शकते, जे पायलटच्या वजनावर अवलंबून असते (जास्तीत जास्त ९५ किलो पर्यंत).

# सिनेसृष्टीतील बहुरंगी व्यक्तिमत्व दादा कोंडके



**निमित्त**

कृष्णा कोंडके ऊर्फ दादा कोंडके (८ ऑगस्ट १९३२-१४ मार्च १९९८) हे मराठी अभिनेते व चित्रपट-निर्माते होते. मराठी चित्रपटांतल्या विनोदी ढंगातील संवादफेकीमुळे त्यांच्या भूमिका लोकप्रिय झाल्या. अभिनयासोबतच त्यांनी प्रामुख्याने मराठी भाषेतील व सोबतच हिंदी व गुजराती भाषांतील चित्रपटांची निर्मितीही केली. प्रेक्षकांना नेमके काय हवे आहे याची चांगलीच जाण त्यांना होती.


विच्छा माझी पुरी करा या वसंत सबनीस लिखित वगनाट्यामुळे कोंडके अभिनेता म्हणून प्रसिद्धीस आले. इ.स. १९६९ साली भालजी पेंढारकरांच्या तांबडी माती चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले. सोंगाड्या (इ.स. १९७१), आंधळा मारतो डोळा , पांडू हवालदार, राम राम गंगाराम, बोट लावीन तिथे गुदगुल्या हे त्यांचे विशेष गाजलेले चित्रपट होत. 'अपना बझार' मध्ये काम करता करता दादा सेवादलाकडे आकर्षित झाले.

दादांचे पिता समान गुरु बाबा उर्फ भालजी पेंढारकर यांचा तांबडी माती हा त्यांचा पहिला चित्रपट. या चित्रपटानंतर दादांनी कधीच मागे वळून बघितले नाही. 'सोंगाड्या' ही दादांची पहिली निर्मिती. हा चित्रपट खूप गाजला व त्यांचा जीवनातील मैलाचा दगड ठरला. दादांनी मराठीत एकूण १६ चित्रपटांची निर्मिती केली. विशेष म्हणजे सर्व चित्रपट रौप्यमहोत्सवी ठरले. हा विक्रमामुळे त्यांचे नाव गिनीज बुकात नोंदले गेले. त्यांनी हिंदीतसुद्धा चार चित्रपटांची निर्मिती केली. उषा चव्हाण ही त्यांची आवडती तारका त्यांच्या अनेक चित्रपटात नायिका होती.

दादांचा जन्म लालबागचा, गिरणी-कामगाराच्या पोटी ८ ऑगस्ट १९३२ रोजी गोकुळाष्टमीत लाभलेल्या या पुत्ररत्नाचे कृष्णा म्हणून नामकरण करण्यात आले. पोरक्या वयातच या कृष्णाच्या लीला उसळून बाहेर येऊ लागल्या. शाळकरी वयातच त्यांना गल्लीतले 'दादा' म्हणून ओळखले जात असे. ही बिरुदावली नंतर कायम राहिली. ज्येष्ठ बंधूंच्या अपकाली निधनामुळे घर सांभाळायची जबाबदारी आली. 'अपना बाजार'मध्ये दरमहा साठ रुपयाने कामावर असतानाच दादा सेवादलाच्या बँडमध्ये काम करू लागले. कलेचा नाद शांत बसू देईना म्हणून प्रसिद्ध गाण्यांची विडंबने करणे, विचित्र गाणी रचणे, त्यांना चाली लावणे हे फावल्या वेळेतले छंद त्यांनी जोपासले. सेवादलात असतानाच त्यांची गाठ निळू फुले, राम नगरकर यांच्याशी पडली. आणि सेवादलाच्या नाटकांत दादा छोटी-मोठी कामे करू लागले. लहानपणापासून खोड्याळ असलेल्या दादांनी 'अपना बाजार' येथे नोकरी केली. जून १९७१मध्ये दादांची प्रमुख भूमिका असलेला सोंगाड्या चित्रपट प्रदर्शित झाला. 'सोंगाड्या'ला सुरुवातीला सिनेमागृह मिळत नव्हते. नंतर तो तुफान गाजला. इतका की बऱ्याच सिनेमागृहांनी जेमतेम चालत असलेला देव आनंदचा 'तेरे मेरे सपने' उतरवला आणि सोंगाड्या लावला. १९७२ साली 'एकटा जीव सदाशिव' प्रदर्शित झाला. या चित्रपटाची हाईप इतकी झाली होती, की खुद्द राज कपूरने आपल्या पोराला लाँच करताना चित्रपटाची तारीख पुढे ढकलली आणि 'बॉबी' पाच महिने उशिरा प्रदर्शित झाला. त्यामागोमाग आलेल्या 'आंधळा मारतो डोळा'ने लाईम-लाईट पुन्हा दादा कोंडकेंवर आणला. १९७५मध्ये 'पांडू हवालदार'च्या रुपात दादा पुन्हा पडद्यावर आले. त्याचबरोबर दादांचा आलेख मात्र चढत गेला.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पावसाळ्यातील भुट्टा खाणे आरोग्यास फायदेशीर

पावसाळ्यात रस्त्यांवर मक्याचे कणीस (भूट्टा) विकणाऱ्या गाड्या दिसतात. जरी मका वर्षभर उपलब्ध असला तरी पावसाळ्यात आपल्याला शेतातून थेट मिळणाऱ्या रसाळ मक्याची चव चाखायला मिळते. सहसा लोकांना ते आगीवर भाजून आणि लिंबू आणि मीठ लावून खायला आवडतात.



भूट्टा जितका चविष्ट आहे, तितकाच तो आरोग्यासाठी फायदेशीर आहे. सेंद्रिय आणि प्रक्रिया न केलेला भूट्टा अनेक आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबरने समृद्ध आहे.

'सायन्स डायरेक्ट' मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, प्रक्रिया न केलेल्या भूट्ट्याचे नियमित सेवन केल्याने हृदयरोग, टाइप-२ मधुमेह, लठ्ठपणा, जास्त वजन आणि पचन समस्यांचा धोका कमी होतो.

'जर्नल ऑफ द अकादमी ऑफ न्यूट्रिशन अँड डायटेटिक्स' मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, जे लोक मक्यापासून बनवलेले पॉपकॉर्न खातात, ते इतरांपेक्षा सरासरी २२% जास्त फायबर वापरतात. यामुळे त्यांची पचनसंस्था चांगली राहते.

भूट्ट्यामध्ये असलेले आवश्यक पोषक तत्व शरीराला ऊर्जा प्रदान करतात, तसेच पचनसंस्था आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. त्यातील दोन शक्तिशाली अँटीऑक्सिडंट्स ल्युटीन आणि झेक्सॅन्थिन दृष्टी चांगली ठेवण्यास मदत करतात. ग्लूटेन-फ्री आणि लो-ग्लायसेमिक इंडेक्स असल्याने, मधुमेही आणि ग्लूटेन संवेदनशील लोकांसाठी देखील हा एक चांगला पर्याय आहे.

त्यात असलेले निरोगी चरबी हृदयाच्या आरोग्यास मदत करतात आणि रक्तदाब संतुलित ठेवण्यास मदत करतात. तसेच, त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स शरीराला फ्री रॅडिकल्सपासून वाचवून कर्करोगाचा धोका कमी करू शकतात.

स्वीट कॉर्न, रेग्युलर कॉर्न (फील्ड कॉर्न) आणि पॉपकॉर्न, हे तिन्ही कॉर्नचे वेगवेगळे प्रकार आहेत, जे चव, वापर आणि पोषणात एकमेकांपासून बरेच वेगळे आहेत.

स्वीट कॉर्न: हे सहसा भाजीच्या रुपात खाल्ले जाते. ते चवीला गोड असते आणि त्याचे दाणे मऊ असतात. त्यात साखरेचे प्रमाण जास्त असते आणि स्टार्च कमी असतो. ते कच्चे, उकडलेले किंवा वाफवून खाल्ले जाते.

रेग्युलर कॉर्न पूर्णपणे पिकल्यानंतर त्याची कापणी केली जाते. ते थेट खाण्यायोग्य नाही.

# श्रीवर्धन बाजारपेठेतील अनधिकृत बांधकामांना श्रीवर्धन नगर परिषदेचे अभय

**श्रीवर्धन : बातमीदार**

फार पुर्वीपासुन श्रीवर्धन पेशवे आळी येथून बाजारपेठेकडे जाण्यासाठी कोपरी मार्ग या नाल्यातील रस्त्याचा वापर केला जात असे. पावसाळ्यात सदरचा नाला पाण्याने भरलेला असल्यामुळे या ठिकाणी वाहतूक होत नसे, परंतु पावसाळा संपल्यानंतर नाला कोरडा झाला की या मार्गावरून बैलगाड्या, सायकली तसेच पादचार्यांची वाहतूक नियमित प्रमाणे सुरू असायची. कालांतराने दादर पुलाजवळील या मार्गावरती अतिक्रमण वाढल्यामुळे हा मार्ग काही दिवसांपासून बंद अवस्थेत होता.



मात्र चार ते पाच वर्षांपूर्वी श्रीवर्धन नगरपरिषदेने या नाल्यावरती पूर्णपणे कॉंक्रीटचा रस्ता तयार करून या ठिकाणाहून दुचाकी वाहने त्याचप्रमाणे पादचारी जातील अशा प्रकारची सोय उपलब्ध करून दिली आहे. सदरचा कॉंक्रीट रस्ता हा दुचाकी व पादचाऱ्यांसाठी असला तरीही या मार्गावरून तीन आसनी रिक्षा, त्याचप्रमाणे काही चार चाकी वाहने देखील नियमितपणे जात असतात. सदरचा कॉंक्रीट मार्ग तयार झाल्या झाल्या या कॉंक्रीट मार्गाच्या दुतर्फा काही बांधकाम व्यवसायिकांनी अनधिकृत दुकान गाळे बांधले आहेत.

अनधिकृत गाळे बांधून झाल्यानंतर त्वरित भाडेतत्त्वावर देखील देण्यात आले आहेत. हा सर्व प्रकार नगरपरिषद प्रशासनाच्या समोर सुरू असून नगरपरिषद प्रशासनाकडून या अनधिकृत बांधकामांना अभय मिळत आहे. बांधकाम व्यावसायिकांनी या कॉंक्रीट रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृत बांधकामे केल्यामुळे रस्त्याची रुंदी देखील कमी झाली आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी अनधिकृतपणे अनेक दुचाकी वाहने पार्किंग केलेली पाहायला मिळतात. तसेच या मार्गावरती न्यू आपला बाजार हे सुपर मार्केट असून त्याच्यासमोर अनधिकृत रिक्षा स्टॅन्ड तयार झालेला आहे.

या ठिकाणी सहा ते सात रिक्षा कायम रांगेमध्ये उभ्या असलेल्या पाहायला मिळतात. सदर कॉंक्रीट रस्ता हा नाल्यावरती स्लॅब टाकून तयार करण्यात आलेला आहे. या मार्गावरून कोणत्याही प्रकारे तीन आसनी रिक्षा किंवा चार चाकी वाहने जाण्यास प्रतिबंध असताना सुद्धा, अनेक वाहन चालक त्याचप्रमाणे रिक्षा चालक या मार्गावरून नेहमी ये जा करताना पाहायला मिळतात. या मार्गावर सतत वाहतुकीची वर्दळ वाढल्यामुळे या ठिकाणी टाकलेला स्लॅब देखील उखडून निघाला आहे. अनेक ठिकाणी स्लॅब मधील लोखंड देखील बाहेर आलेले दिसून येत आहे.

या सर्व प्रकाराकडे श्रीवर्धन नगरपरिषदेने कानाडोळा करण्याचे धोरण अवलंबिले आहे. सदरचे अनधिकृत गाळे उभे राहिल्यानंतर गाळे बनविणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना नगरपरिषदेने अद्याप कोणत्याही प्रकारे नोटीसा देखील बजावलेल्या पाहायला मिळत नाहीत. तरी नगर परिषदेने सर्व अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना नोटीसा बजावून अनधिकृत बांधकाम काढून टाकण्या बाबत समज द्यावी. अन्यथा नगर परिषदेने तोडक कारवाई करुन ते अनधिकृत बांधकाम जमीन दोस्त करावे. अशी मागणी केली जात आहे.

## महसूल सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा



**कर्जत : प्रतिनिधी**

महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरता दरवर्षी दिनांक एक ऑगस्ट हा महसूल दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यात येतो. यावर्षी एक ऑगस्ट पासून ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यभरात महसूल सप्ताह साजरा करण्यात आला.

पानंद शिवरस्त्यांची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे या अनुषंगाने तहसील कार्यालय कर्जत अंतर्गत सात महसूल मंडळामध्ये पानंद व शिवरस्त्यावरील असणारी अतिक्रमणे काढून रस्ते मोकळे करून दुतर्फा झाडे लावण्याचे कार्य करण्यात आले विशेष बाब म्हणजे चांधई ते स्मशानभूमी गणेश घाट हा रस्ता ग्रामस्त व प्रशासन यांच्या माध्यमातून जे .सी.पी ने खुला करून दूतर्फा झाडे लावण्याचे काम मंडळ अधिकारी संतोष जांभळे व त्यांच्या तलाठी सहकाऱ्यांकडून करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत कार्यक्रम आयोजित करून तहसीलदार कर्जत धनंजय जाधव व नायब तहसीलदार शिरीष शहापुरे व पुरवठा अधिकारी रवींद्र दळवी यांचे हस्ते विविध दाखले वाटप करण्यात आले. विशेष सहाय्य योजने अंतर्गत लाभार्थ्यांना घरभेटी घेऊन अनुदान वाटप करण्यात आले.

## 'हर घर तिरंगा' प्रभावीपणे अंमलबजावणी करा -जिल्हाधिकारी जावळे

**रायगड : प्रतिनिधी**

'हर घर तिरंगा' ही मोहीम लोक चळवळ बनली असून यामध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग असतो. यंदा देखील हर घर तिरंगा अभियान उत्साहाने राबवून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करा, असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

हर घर तिरंगा अभियानांतर्गत पहिला टप्पा ८ ऑगस्टपर्यंत, दुसरा टप्पा ९ ते १२ ऑगस्ट आणि तिसरा टप्पा १३ ते १५ ऑगस्ट या तीन टप्प्यात करावयाच्या कार्यवाही बाबत शासनाकडून सूचना आलेल्या आहेत. हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक घरावर तसेच शासकीय/निमशासकीय सहकारी/खासगी आस्थापना कार्यालयात, अमृत सरोवर, वारसा स्थळे या ठिकाणी राष्ट्रध्वज फडकवण्यात यावा. ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत आणि जिल्हास्तरावर मोठ्या प्रमाणात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. वारसा स्थळांच्या ठिकाणी रोषणाई करण्यात येणार आहे. शाळा, महाविद्यालयामध्ये विविध विषयांवर स्पर्धा तसेच, रॅली, प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. याबरोबरच जिल्ह्यात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र शासन
आधारसामग्री संकलन व नियोजन व जलविज्ञान मंडळ, नाशिक अंतर्गत,
कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, कळवा- (ठाणे)
पत्ता :- सहकार विद्यालय समोर, जुना मुंबई-पुणे महामार्ग, कळवा (ठाणे)४००६०५
ई-मेल :- echpthnrediffmail.com दूरध्वनी क्रमांक ०२२-२५४२६०५३
(Recall-२ फेर-२) ई-निविदा सुचना क्र ०२सन २०२५-२०२६
Main Portal: http://mahatenders.gov.in

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांनी राखून ठेवला आहे . अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविणेत येईल.

कामाचे नांव-: Development Of Real Time Streamflow Forecasting and Reservoir Operation Decision Support System (RTSF & RO DSS) and Operation & Maintenance Support During Monsoon Period For 05 Years AMC(2026-2030) For West Flowing River Basins In Konkan Region.
Maharashtra State

जिल्हा :- ठाणे
ई-निविदा उपलब्ध कालावधी दिनांक ११/०८/२०२५ ते दिनांक-१९/०८/२०२५
ई-निविदा उघडणे :- दिनांक २०/०८/२०२५ वेळ १७.०० वा.
स्थळः कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा (ठाणे) यांचे कार्यालय
* संकेतस्थळावर प्रसिध्द होणा-या निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार कंत्राटदाराने किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीने संबंधित कार्यालयात उपस्थित रहावे अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही

जा. क्र. जविप्रविक / लेशा-२/११२९/२०२५
कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग,
कळवा (ठाणे) यांचे कार्यालय,
दिनांक :- ०५/०८/२०२५

सही/-
श्रीमती वै, रा. कुरणे
कार्यकारी अभियंता,
जलविज्ञान प्रकल्प विभाग,
कळवा (ठाणे)

## 'कोमसाप' खोपोली शाखेच्या अध्यक्षपदी प्रकाश राजोपाध्ये

**खोपोली : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा खोपोलीच्या अध्यक्षपदी जनता विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षक व साहित्यिक प्रकाश राजोपाध्ये यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्ष म्हणून प्रा.डॉ.भाऊसाहेब नन्नवरे, कार्यवाहपदी नरेंद्र हर्डीकर, सह कार्यवाह म्हणून जयश्री पोळ, खजिनदार प्रा.सुरेश चव्हाण व जिल्हा प्रतिनिधी म्हणून कवयित्री रेखा कोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



सन २०२५-२०२८ या तीन वर्षासाठी नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. के.एम. सी.कॉलेजचा विद्यार्थी साईनाथ संजय भोगे याची 'युवा प्रतिनिधी' निवड करण्यात आली आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून पत्रकार नितीन भावे, सूर्यकांत सरोदे, जनार्दन सताणे, प्रा.डॉ.गणपती मुळीक व शितल अहिर यांची निवड करण्यात आली आहे. शाखेचे सल्लागार म्हणून खोपोलीचे माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, वामनराव दिघे, लेखिका उज्वला दिघे, वसंत देशमुख मेमोरियल स्कूलचे अध्यक्ष उल्हास देशमुख, अल्टा कंपनीचे मॅनेजर बी.एस. म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे. नवनियुक्त कार्यकारिणीचे सर्व सदस्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

पेण नगरपरिषद, पेण.
जाहीर फेर निविदा

पेण नगरपरिषद, पेण रायगड यांचेकडून सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता पाणीपुरवठा विभागाकडील १२५ KVAआणि ३२० KVA क्षमतेच्या जनरेटर भंगार साहित्य विक्री करणेकामी वार्षिक दरपत्रके मागविणेस दिनांक २३/०१/२०२५ अन्वये मंजुरी दिली आहे. तरी इच्छुक व अनुभवी ठेकेदारांकडून जाहिर निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा फॉर्म फी रक्कम रुपये | अनामत रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा विभागाकडील १२५ KVAआणि ३२० KVA क्षमतेच्या जनरेटर भंगार साहित्य विक्री करणेबाबत. | रु.५००/- | रु.१०००/- |

१) निविदा फॉर्म विक्रीचा दिनांक ८/८/२०२५ ते १८/८/२०२५ पर्यंत पेण नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यत मिळतील.
२) जुने साहित्य (भंगार सामान) पाहणीसाठी यावयाचे असल्यास निविदा कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत दुपारी ३.०० ते ५.०० च्या दरम्यान पाणीपुरवठा विभागात संपर्क साधावा.
३) निविदा सिलबंद पाकीटातून या कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवसाखेरीज जास्तीत जास्त उशिरा दिनांक १९/८/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यत पोहचतील अशा बेताने पाठवावे.
४) निविदाचे खरेपणाबद्दल अनामत रक्कम रोखीने भरुन त्याचा पावती क्रमांक निविदा लखोटयावर नमूद करावा. त्याशिवाय निविदा वैध समजली जाणार नाही.
५) कोणतीही एक अथवा सर्वच निविदा कारण न देता नाकारणेचा व रद्द करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे
६) प्राप्त झालेल्या निविदा त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता अथवा कार्यालयाच्या सोयीनुसार कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील.
७) निविदाधारकांचे दुकाने निरिक्षक प्रमाणपत्राची छांयाकीत प्रत निविदा सोबत जोडावी.
८) ज्यांची निविदा मंजूर होईल त्यांनी योग्य त्या स्टॅम्प पेपरवर कामाबाबत करारनामा करुन देणेचा आहे.
९) निविदाधारकांनी निविदा दोन वेगवेगळ्या लिफाफयात भरणे बंधनकारक आहे.
१०) निविदाधारकांनी लिफाफा क्रमांक १ मध्ये पुढीलप्रमाणे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.
अ) निविदा इसारा रक्कम छांयाकित प्रत.
ब) दुकाने निरिक्षक यांचे प्रमाणपत्र/व्यवसाय नोंदणी दाखला.
क) मागील वर्षाची आयकर भरल्याचे विवरणपत्र
ड) पॅनकार्ड
इ) आधारकार्ड
ई) GST नोंदणीप्रमाणपत्र
उ) परिशिष्ट-अ (प्रतिज्ञापत्र).
११) लिफाफा क्रमांक २ मध्ये दरपत्रक भरण्यात यावी.
१२) लिफाफा क्रमांक १ मध्ये उल्लेख केलेली सर्व कागदपत्रे जोडली असतील तरच लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येईल यांची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.
याबाबतची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवसांखेरीज कार्यालयात मिळू शकेल.

दिनांक : ७/८/२०२५
जा.क्र. पेनप/का.६/पा.पु/२०२५/१५०८

सही/-
मुख्याधिकारी
पेण नगरपरिषद, पेण.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा
राम प्रहर

प्रोसेस जमा रू.५०/-
मा. हंगरगेकर सो
वकील तुळसा मु. चंदनशिवे

जाहीर नोटीस
पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

नि ८/ड
दिवाणी चौकशी अर्ज क्र. ८८५/२०२५
ने.ता.१६/९/२०२५

१ श्रीमती विभावरी संपत निरभवणे
वय ६६ वर्षे, व्यवसाय: गृहिणी,
राहणार : फ्लॅट नं. बी-१०४, पहिला माळा,
पंचम को. ऑप. हौ. सो., प्लॉट नं. ३८,
सेक्टर-२०, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९.
२ सौ. सविता मनोज पाटील
वय ४५ वर्षे, व्यवसाय : नोकरी,
राहणार : २, केईएम-१२९, ब्लॉक बी,
गांधी नगर, विक्रोळी जोगेश्वरी लिंग रोड,
मुंबई-४०००६०
३ सौ. कविता प्रशांत गायकवाड
वय ४१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,
राहणार : फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
गोयलविला को. ऑप. हौ.सो., प्लॉट नं. ८,
रेयान इंटरनॅशनल शाळेजवळ, सेक्टर-११,
खारघर, नवी मुंबई-४१०२१०.
४ प्रमिला संपत निरभवणे,
वय ३८ वर्षे, व्यवसाय: नोकरी,
सध्या राहणार : ३९ डच मेडोज डॉ, कोहोज, न्यू यॉर्क,
युएसए-१२०४७-४९४७
कायमचा पत्ता: फ्लॅट नं. बी-१०४,
पहिला माळा, पंचम को. ऑप. हौ.सो., प्लॉट नं. ३८,
सेक्टर-२०, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९.
... अर्जदार क्र. १ ते ४

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाला

वरील अर्जदार क्र. १ यांचे पती तसेच अर्जदार क्र. २ ते ते ४ यांचे वडिल कै. संपत गेंदा निरभवणे यांचे दिनांक १०/०४/२०२४ रोजी हिरानंदानी फोर्टीज् हॉस्पीटल, वाशी, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत.
कै. संपत गेंदा निरभवणे व अर्जदार क्र. ४ प्रमिला संपत निरभवणे यांनी दिनांक २३/०७/२००९ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखतानुसार खालील नमूद मिळकत विकत घेतलेली आहे सदर मिळकतीमध्ये कै. संपत गेंदा निरभवणे यांचा ५० टक्के अविभाज्य हिस्सा आहे.

मिळकतीचे वर्णन

Flat No. 104, B Wing, First Floor, Building named as "Pancham", situated at Plot No. 38, Sector-20, Kamothe, Navi Mumbai, admeasuring about carpet are 387 Sq.ft. (Built up area 465 sq.ft.) which is equivalent to 43.21 sq.mtrs. and open terrace having carpet area 23 sq.ft. (built up area 23 sq.ft.) which is equivalent to 2.13 sq.ft.

वरील मिळकतीमधील कै. संपत गेंदा निरभवणे यांच्या ५० टक्के अविभाज्य हिस्सासंदर्भात अर्जदार क्र. १ ते ४ यांनी कै. संपत गेंदा निरभवणे यांचे वारस या नात्याने वारस दाखला मिळविण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. तरी वरील वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास किंवा अर्जदार हे मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर राहून आपली लेखी हरकत दाखल करावी, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य त्या हरकती न दाखविल्यास तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य त्या हरकती न दाखविल्यास सदरहू मा. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीस पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारचा हरकतीचा विचार केला जाणार नाही.
तारीख २८/०७/२०२५ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
लिपीक
दिवाणी न्यायालय
क. स्तर पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सह. अधिक्षक
दिवाणी न्यायालय
क. स्तर पनवेल

## माथेरानमधील हातरिक्षा प्रथा बंद करण्याचे आदेश

**माथेरान,नेरळ : बातमीदार**

माथेरान पर्यटनस्थळी ब्रिटिश काळापासून सुरू असलेली हातरीक्षाची प्रथा म्हणजेच माणसाने माणसाला ओढण्याची प्रथा सुरू आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही हाताने ओढल्या जाणाऱ्या रिक्षांच्या वापराबद्दल नाराजी व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी महाराष्ट्र सरकारला माथेरानमधील ही 'अमानवी' प्रथा सहा महिन्यांत थांबवण्याचे आणि त्याऐवजी 'ई-रिक्षा' कडे वळण्याचे निर्देश दिले.

माथेरानमधील हातरिक्षा पूर्णतः बंद करण्याचे आदेश देताना भारतासारख्या विकसनशील देशात मानवी प्रतिष्ठेच्या मूलभूत संकल्पनेविरुद्ध असलेल्या अशा प्रथेला परवानगी देणे सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या घटनात्मक प्रतिज्ञांना कमी लेखते असे मुख्य न्यायाधीश भूषण आर. गवई, न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने म्हटले आहे.



माथेरानला दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात. गुजरातमधील केवडिया येथील सरदार पटेलांचा सर्वात उंच पुतळा असलेल्या ठिकाणी स्थानिकांना ई-रिक्षा भाड्याने देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे माथेरानमधील स्थानिकांना ई-रिक्षा भाड्याने देता येतील का याबाबतचा आढावा घेण्याचे निर्देश राज्य सरकारला देण्यात आले. खंडपीठाने म्हटले की माथेरान हे एक पर्यावरणपूरक गिरीस्थान असून याठिकाणी आपत्कालीन वाहने वगळता मोटारींवर बंदी आहे.त्यामुळे पर्यटक आणि वस्तूंच्या वाहतुकीसाठी हाताने ओढलेल्या रिक्षांवर अवलंबून रहावे लागते.सहा महिन्यांत हातरिक्षा टप्प्याटप्प्याने बंद करण्याचे निर्देश सरन्यायाधीशांनी दिले.

माणगांव नगरपंचायत, माणगांव
जाहिर सुचना
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०

माणगांव नगरपंचायत हद्दीमधील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नविन घरकुल नोंदणी करीता जवळील सेतु सुविधा केंद्रावर जाऊन **वेब पोर्टल वर इच्छुक लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी.**
**वेब पोर्टल लिंक :-** https://pmaymis.gov.in/PMAYMIS२ २०२४/ pmayDefault.aspx

**पात्रता :-**
१) भारतामध्ये लाभार्थी तसेच कुटूंबामधील इतर सदस्यांच्या नावे पक्के घर नसावे.
२) लाभार्थी गेल्या २० वर्षात कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
३) वार्षिक उत्पन्न मर्यादा ३.०० लक्ष रुपये कमाल राहिल.

**नवीन घरकुल नोंदणी ऑनलाईन करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे :-**
१. अर्जदाराचा आधार तपशील (मोबाईल नंबर लिंक असलेले).
२. कुटुंबातील इतर व्यक्तीचे आधारकार्ड (पती, पत्नी, १८ वर्षाखालील अविवाहित मुले/मुली).
३. बँकेचे पासबुक (आधार लिंक असलेले)
४. जात प्रमाणपत्र
५. उत्पन्नाचे चालु वर्षाचे प्रमाणपत्र
६. जागा मालकीचा पुरावा (सातबारा, खरेदीखत इ.)
७. शिधापत्रिका
८. मतदार कार्ड

**संपूर्ण कागदपत्राच्या मुळ प्रती सह ऑनलॉईन नोंदणी करुन भरलेल्या अर्जासोबत सदरील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती माणगांव नगरपंचायत कार्यालयात जमा करावे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० योजनमध्ये लाभ घेण्याकरीता आवाहन करण्यात येत आहे.** याबाबतीत अधिक माहितीकरीता प्रधानमंत्री आवास योजन कक्ष माणगांव नगरपंचायत कार्यालय येथे संपर्क साधावा.

दिनांक : ०७/०८/२०२५
क्र. मानपं/जा.नि.सुचना/८३१/२०२५-२०२६

सही/-
मुख्याधिकारी
माणगांव नगरपंचायत

## निवडक

### २४ बॅटऱ्यांचा सेट चोरीस

**पनवेल :** गव्हाण फाटा येथील एअरटेल मोबाईल कंपनीच्या टॉवरला लावण्यात आलेले ७२ हजार रुपये किंमतीचा एक अमरराजा कंपनीच्या काळ्या रंगाच्या २४ बॅटर्यांचा सेट चोरीस गेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. येथील सुरक्षा रक्षक सोमनाथ जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार तेथे असलेल्या एअरटेल मोबाईल कंपनीच्या टॉवरला लावण्यात आलेले ७२ हजार रुपये किंमतीचा एक अमरराजा कंपनीच्या काळ्या रंगाच्या २४ बॅटर्यांचा सेट चोरीस गेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

### बेपत्ता महिलेचा शोध

**पनवेल :** २१ वर्षीय सलोनी सागर काशीद ही महिला



मेडिकल मधून चॉकलेट घेऊन येते असे सांगून निघून गेली, मात्र ती घरी परत न आल्याने ती हरवली असल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली. या महिलेचा रंग गोरा, उंची पाच फूट तीन इंच, चेहरा उभट आहे. तिच्या उजव्या हाताच्या मध्यभागी मा असे गोंदवलेले आहे. तिला मराठी, हिंदी भाषा बोलता येत असून अंगात काळा रंगाचा कुरता आणि गोल्डन रंगाचा पायजमा व ओढणी घातलेली आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार शरद घुगे यांच्याशी संपर्क साधावा.

### १२ ऑगस्टला पेन्शन अदालत

**नवी मुंबई :** कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार १२ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी १२ वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे. या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे कोकण विभाग तहसिलदार, (सामान्य प्रशासन) नरेश जगताप यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

## सीकेटी कॉलेजमध्ये मोडीलिपी प्रशिक्षण कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने २८ जुलै ते २ ऑगस्ट,२०२५ या कालावधीत मोडीलिपी प्रारंभिक व प्रगत प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध मोडीलिपी अभ्यासक महेश जोशी, अध्यक्ष वसुंधरा भाषा मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे हे प्रमुख प्रशिक्षक लाभले होते. या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ सोमवार २८/०७/२०२५ रोजी झाला. या वेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. इतिहास विभागातील तृतीय वर्षाच्या ३६ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता.

कार्यशाळेत महेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना मोडीलिपी अध्ययनाचे आणि संशोधनाचे महत्त्व समजावून सांगून मोडीलिपीचे प्रारंभिक ज्ञान देवून स्वतःचे नाव लिहिणे, मोडी लिपी लिप्यांतर, उतारा वाचन व नाममुद्रा बनविण्यास शिकविले. या कार्यशाळेचा समारोप समारंभ शनिवार २/०८/२०२५ रोजी संपन्न झाला.

कार्यशाळेचे यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.(डॉ.) एस.के.पाटील, आय.क्यू. एस. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांनी मार्गदर्शन आणि शुभेच्छा दिल्या. या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी इतिहास विभागाच्या डॉ. रत्नप्रभा म्हात्रे आणि प्रा. भावेश भोईर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आयकर विवरण भरण्यावर प्रशिक्षण सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी कर्मचारी कल्याण समितीच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी आयकर विवरण भरण्याबाबत विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले.

या सत्राचे उद्दिष्ट कर्मचाऱ्यांना स्वयंपूर्ण बनवणे व त्यांना ऑनलाईन आयटीआर भरण्याच्या प्रक्रियेबाबत सखोल माहिती देणे हे होते. या सत्रामध्ये आयकर कायद्याविषयी प्राथमिक माहिती, विविध प्रकारचे विवरण फॉर्म्स (ITR-1, ITR-2 इत्यादी), त्यांची अचूक निवड, आयकर पोर्टलवरील आवश्यक स्टेप्स, आवश्यक कागदपत्रे, टॅक्स क्रेडिट (Form 26-S) तपासणी, आणि रिफंड प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षण सत्राचे मार्गदर्शन सीए गुरुदत्त मोहन यांनी केले तसेच त्यांच्या सखोल ज्ञानाने आणि सहज समजावून सांगण्याच्या पद्धतीने उपस्थित कर्मचाऱ्यांनी सत्राचा लाभ घेतला शेवटी प्रश्नोत्तर सत्रात कर्मचाऱ्यांनी आपले शंका स्पष्ट केल्या. प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या सत्राचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल कर्मचारी कल्याण समितीचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे संयोजन कर्मचारी कल्याण समितीच्या समन्वयक प्रा. रिजवाना मोमीन यांनी केले तसेच समितीतील इतर सर्व सदस्य, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले तसेच समितीने अशा उपयुक्त सत्रांचे सातत्याने आयोजन करावे, अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली.

## फुंडे विद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली.

विद्यालयाचे प्राचार्य बी.बी.साळुंखे , उपमुख्याध्यापिका एस.डी.थोरात, पर्यवेक्षिका एस.एम.बाबर, एस.एस.पाटील उपस्थित शिक्षक वृंदाच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यालयातील अमृता राजभर या विद्यार्थिनीने क्रांतिसिंह नाना पाटील यांचे जीवन कार्य सांगितले. त्या नंतर विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आर.जी. शेळके यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य त्यांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगितले. नाना पाटील यांनी साताऱ्यामध्ये प्रतिसरकारची स्थापना झाल्यावर ग्रामीण भागात ब्रिटीशांचे अस्तित्व नाम मात्र राहिले. तसेच प्रतिसरकार व पत्रीसरकार या मधील फरक सांगितला महाराष्ट्रातील एक देशभक्त, झुंजार नेते आणि क्रांतिसिंह म्हणून ते ओळखले जातात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधिका खामकर व आभार विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक एस.डी.म्हात्रे यांनी मानले.

## एमएनएम विद्यालयात अग्निशमन विभागाचे फायर ड्रिल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरु नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी सिडको अग्निशामक विभाग उलवे नोड यांच्या विद्यमाने फायर ड्रिल आयोजित करण्यात आले. अकस्मित आग लागल्यास तात्काळ विझवण्यासाठी आग प्रतिबंधक उपकरणांच्या साह्याने अग्निशमन दलाच्या जवानांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखविली.

दरम्यान अग्निशमन अधिकारी श्री राठोड यांनी विद्यार्थ्यांना अग्नि, अग्नीचे प्रकार, घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ठिकाणी घ्यावयाची काळजी तसेच प्रतिबंधात्मक उपाय याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी, माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांना आग सुरक्षक वेश परिधान करून, अग्निशामक सिलेंडरचा वापर करून आग विझवण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. तसेच फायर अँड सेफ्टी विभागाच्या अंबरनाथ भोईर यांनी माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी फायर आणि सेफ्टी या विषयावर प्राथमिक स्वरूपाची माहिती दिली आग प्रतिबंधक उपकरणांची तोंड ओळख करून देत , अग्नी लागल्यास घ्यावयाच्या सुरक्षिततेची माहिती दिली.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या अग्निशमन बद्दलच्या माहितीचा उपयोग दैनंदिन व्यवहारामध्ये करावा असे नमूद केले. शाळेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, माध्यमिक विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला.



## गव्हाण विद्यालयात वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये संस्थेचे रायगड विभागाचे सहायक विभागीय अधिकारी विलासराव जगताप यांचे शुभहस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

जगताप यांनी सोमवार ४ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यालयास सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर तसेच ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख संजय उगले, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे आदी उपस्थित होते.

' एक पेड माँ के नाम । ' या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी चालू असून अनेकांचा या उपक्रमास चैतन्यशील व कृतिशील प्रतिसाद देत आहेत. सहायक विभागीय अधिकारी विलासराव जगताप यांनी उत्स्फूर्तपणे शालेय प्रांगणात आपल्या हस्ते लावलेल्या रोपामुळे हा उपक्रम अधिक गतिमान होईल, अशी प्रतिक्रिया या विभागाचे प्रमुख प्रमोद करावकर यांनी व्यक्त केली.

## शिवकर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मोनिका पोपेटा बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवकर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाची निडवणुक गुरुवारी होती. या निडवणुकीत भारतीय जनता पक्षाच्या मोनिका पोपटा यांची उपसरपंचपदी बिनविरोध झाली. त्याची निवड जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी जल्लोष साजरा केला. यावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी मोनिका पोपेटा यांची उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले तसचे त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



या वेळी भाजपनेते राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, सदस्य प्रांजल पाटील, मंगेश ढवळे, संतोष मते, रित पाटील, रेश्मा पाटील, सुरेखा टोपले, माजी सरपंच मोहिनी पोपेटा, माजी उपसरपंच रविंद्र ढवळे, माजी सदस्या सुगंधा पोपेटा, ग्रामसेवक सचिन पाटील, गोपाल पाटील, गोटीराम ढवळे, चंद्रकांत ढवळे, तुकराम टोपले, मिलींद पोपेटा, बबन ढवळे, मोहन पोपेटा, तुकाराम तुपे, तुकाराम पाटील, गोपिनाथ ढवळे, शालीक पाटील, अविनाश ढवळे, महादेव माळी, किसन पोपेटा,माया पाटील, पुंडलिक ढवळे, रोशन तुपे, अरविंद्र माळी, अक्षय पाटील समिर पोपेटा, हरिचंद्र ढवळे, जगदीश पोपेटा आदी उपस्थित होते.

## सुकापूर येथील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना वह्यावाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत दादा ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या निमित्त सुकापुर येथील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमासाठी उपस्थित अनुसूचित जाती मोर्च्याचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष व माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष व सुकापूर ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य व ज्येष्ठ नेते अशोक पाटील, सुकापुर ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिवेश भगत,,सुकापुर ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत पोपटा, जेष्ठ नेते हनुमान खुठले, पालीदेवद पंचायत समिती सरचिटणीस उदय महस्कर, युवा मोर्चा अध्यक्ष महेश केणी, युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष राहुल पोपटा, बूथ अध्यक्ष प्रमोद पोपटा, बूथ अध्यक्ष प्रशांत गांगुर्डे आधी भाजपचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## डी.डी. विसपुते कॉलेजमध्ये 'बुक मेहफिल'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इन्फिनीटी फाऊंडेशन आणि डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, न्यू पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'बुक मेहफिल' या विशेष पुस्तक स्नेहमेळाव्याचे रविवारी करण्यात आले.



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगरपालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. पुरुषोत्तम पाटोदकर, अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेलचे कार्यवाह शामनाथ पुंडे, पनवेल महापालिकेच्या जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्सच्या बी कॉम विभागाचे समन्वयक डॉ. किरण देशमुख, पनवेल सायकल मेयर अरुण खेडवाल, तसेच रणथॉन सायकलिंग क्लबचे संस्थापक पुरण सिंग आदी उपस्थित होते.

वाढत्या धकाधकीच्या आयुष्यात पुस्तक वाचन कमी होऊ लागले आहे, हे वाचन प्रेम वाढवणे, ज्ञानाची देवाणघेवाण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे या हेतूनेच ही 'बुक मेहफिल' आयोजित करण्यात आली होती. मैत्र दिनाच्या पार्श्वभूमीवरती 'पुस्तक हेच आपले खरे मित्र आहेत हे पटवून देऊन, उपस्थित मान्यवरांनी आपले मौलिक विचारातून वाचनाच्या सवयीचे महत्त्व पटवून दिले.

या कार्यक्रमाचे आयोजन आदर्श ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष धनराज विस्पुते, डी. डी. विस्पुते कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे इन्फिनीटी फाऊंडेशनचे अध्यक्ष आयुफ अकुला आणि सल्लागार मुग्धा म्हात्रे यांच्या पुढाकारातून करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इन्फिनीटी फाऊंडेशन व डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशनचे सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी विशेष मेहनत घेतली.

## राख्या खरेदीसाठी महिलावर्गाची लगबग

**उरण : वार्ताहर**

रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर उरण बाजारपेठ विविधांगी राख्यांनी सजली असल्याचे दिसून येत आहे. बहीण-भावाच्या पवित्र नाते जपणाऱ्या रक्षाबंधन सणास आपल्या परंपरेत व संस्कृतीत फार मोठे महत्त्व आहे. त्यादृष्टीने उरण शहरातील राखी विक्रेत्या दुकानादारांची दुकाने विविधांगी राख्यांनी सजली असून बाजारपेठेतील राखी विक्रेत्यांनी विविध प्रकारच्या राख्यांची आकर्षकरित्या सजावट ठेवली आहे.



विक्रीसाठी आणलेल्या राख्यांमध्ये डायमंड डिझायनर, मुंबई स्टाईल राखी, रेशीम वुलन गोंडा राखी, बच्चे कंपनीसाठी म्युझिक लाईट राखी तसेच विविध रंगांच्या डिझाईनने सजविलेल्या राख्या बाजारात आल्या आहेत.

उरण बाजार पेठेत राखी खरेदी शाळेतील मुली, महिला वर्ग मोठ्या संखेने येत असतात दहा रुपयांपासून ते शंभर रूपये व त्याहून अधिक किमतीच्या राख्या विक्रीसाठी ठेवल्या आहेत. बहीण-भावाच्या अतूट प्रेमाची साक्षी देणाऱ्या या सणाला मोठी परंपरा लाभली आहे. या सणाचे महत्त्वही मोठे असल्याने बाजारपेठेत राख्या खरेदी करण्यासाठी महिलांची खुपच गर्दी असते, अशी माहिती राखी विक्रेती माधुरी परवा यांनी दिली.




### तवाचा पावसाला

आबाल गरीराचा, ईजा चमकाच्या
वाऱ्याचे भवऱ्याशी भूतवाल उठाची
मिरगाचे पान्याची येलवं सुरवात
शालांव सुरू ज्येष्ठानूस व्हवाची
निवचनींशी-कौलांवशी निंगोल्या पराच्या
गली-बोलांशी - खल्यांशी वावाचं ईरं
वड्डाची आयव - बाबु नको जाव पान्यान
तरीपुन कागदव्हरी सोराला जावाचूं पुरं
बेरकांचा डराव - डरावपून बरा वाटाचा
मुठं, चिंबोऱ्यांना शेतां-मालाना जावाचा
उदवनीची चिवनी गलाशी गुतवाची
रास बाव बगल्यान - बोक्यान पराचा
सगलीकरं हिरवल, झऱ्यांचा खलखलाट
नागमोरी पायवाट, धरती नवरीवानी नटाची
पानांचे इरलींशी, कांबल्यांचे खोलींशी
पान्याची झर हालुस मुका झ्येवून जावाची
नांगरनी, पेरनी, खन्नी, लावनी, बेन्नी,
कापनी, मलनी, यी कामां भात शेतीची
बाया-बापये पोरां-बाला कष्टालू-हौसची
तवा सन-उत्सवांना लयुस मज्ज्ञा हासाची !!



-अरुण द. म्हात्रे, उरण

# सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे भाजप कार्यकर्त्यांनी पेणमध्ये केले स्वागत

**पेण: प्रतिनिधी**

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे मुंबई–गोवा महामार्गाच्या कामाचा प्रगतीचा आढावा घेण्यासाठी पळस्पे ते इंदापूर पाहणी दौऱ्या दरम्यान पेण येथे आमदार रविशेठ पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, नगराध्यक्षा प्रितम पाटील व भाजप कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी आमदार रविशेठ पाटील, युवा नेते ललित पाटील, माजी सभापती दर्शन बाफणा, माजी नगरसेवक अजय क्षिरसागर, प्रकाश रामाणे, भाजप शहर अध्यक्ष रवींद्र म्हात्रे, भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्षा प्रचीता पाटील, संजय पाटील, मच्छिन्द्र पाटील आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





यावेळी माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी पेणमधून जाणाऱ्या रस्त्यांच्या समस्या विषयीचे निवेदन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना दिले. यामध्ये प्रामुख्याने पेण रेल्वे स्टेशन समोरील अंडरपासच्या जवळ असलेल्या पेट्रोल पंपाचे अलिकडून अंदाजे ६० मीटर पासून पेण शहरातून अलिबागकडे जाण्यासाठी जे रॅम्पचे काम केले आहे. त्या ठिकाणी मोठ्या गाड्यांना वळण बसत नसल्याने वाहतू कोंडीची समस्या होत असल्याचे मंत्री महोदयाच्या निदर्शनास आणून दिले. नागरीकांच्या गैरसोईबाबत आपण त्वरीत मार्ग काढावा अशी विनंती यावेळी करण्यात आली.नागरिकांना सुरक्षित आणि सुलभ प्रवास सुविधा मिळाव्यात यासाठी आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश यावेळी अधिकाऱ्यांना देण्यात आले. महामार्गाचे काम दर्जे दार, सुरक्षित व वेळेत पूर्ण होणे अत्यंत आवश्यक असल्याचे मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी सांगितले.

## कर्णधार पंकज इटकरचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित सन्मान

**खोपोली : प्रतिनिधी**

पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस ५ ऑगस्ट रोजी मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.पनवेल तालुक्यात विविध क्रीडा स्पर्धेंचे आयोजन या वेळी करण्यात आले होते.

या वेळी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सोळा वर्षाखाली क्रिकेट संघाचा तडाखेबंद फलंदाज व कर्णधार पंकज प्रकाश इटकर यांनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल त्याचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते इंग्लिश विलो बॅट देऊन सन्मान करण्यात आला. यावर्षी रायगड जिल्ह्यात एमसीएच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सोळा वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत पंकज इटकर यांनी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाचे नेतृत्व केले असून रायगडच्या संघाला त्यांनी सुपर लीग फेरीत प्रवेश मिळवून दिला आहे.आपल्या तंत्रशुद्ध व तडाखेबंद फलंदाजी करताना त्यांनी साखळी फेरीत खेळलेल्या पाच सामन्यात ३२२ धावा काढल्या आहेत त्यात त्यांनी एक शतके दोन अर्धशतके ठोकली आहेत तर गोलंदाजी करतांना त्यांनी २२ गडी बाद केले आहेत.

पनवेलच्या मिडल क्लास सोसायटी येथील क्रिकेट अकॅडमी मध्ये तो रवी सोलंकी यांच्याकडून क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे. त्याच्या सन्मानाच्या कार्यक्रमा प्रसंगी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सदस्य प्रदीप खलाटे, सुमित झुंझारराव, विनय पाटील, सुयोग चौधरी, प्रकाश इटकर उपस्थित होते.

## रायगड पोलिस दल करणार अमली पदार्थविरोधी जनजागृती

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड रायगड पोलिस दल करणार अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम राबवणार आहे. बहीण मागते ओवाळणी, नको करू नशेने शरीराची हानी हे या मोहिमेचे ब्रीदवाक्य असेल , अशी माहिती रायगड पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांनी बुधवरी (दि. ६ ) पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला जिल्हा पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांच्यासह अप्पर पोलिस अधीक्षक अभिजीत शिवथरे, स्थानिक गुन्हे विभागाचे पोलिस निरीक्षक मिलिंद खोपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, मानसोपचार तज्ज्ञ अर्चना सिंह आदी उपस्थित होते.



**रायगड जिल्ह्यातील गणपती सणाच्या उत्सवात गणपती मंडळांनी अंमली पदार्थाविरोधातील जनजागृती व व्यसनमुक्तीसाठी देखावे तयार करून जनजागृती करावी. नागरिकांनी सतर्क राहून अंमली पदार्थापासून दूर राहावे, तसेच अंमली पदार्थांची तस्करी, साठा आणि विक्री करणाऱ्या व्यक्तींबाबत माहिती असल्यास मानस हेल्प लाईन क्रमांक १९३३ वर कळवावे.**

**–आँचल दलाल, पोलिस अधीक्षक रायगड**

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने भारत देश नशामुक्त करण्याचा धोरण अवलंबले आहे. यासाठी जिल्हास्तरावर अंमली पदार्थांची तस्करी, विक्री, व्यापार, उत्पादन यावर आळा बसावावा म्हणून ऑगस्ट महिन्यात कोकण परीक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी अंमली पदार्थ विरोधात मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत, त्यानुसार रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात ही मोहीम राबविण्यात येणार आहे. रायगड जिल्हा रुग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञ विभाग, निर्भया पथक आणि पोलीस ठाण्यांतील पोलीस कर्मचारी यांचे प्रतिनिधी संयुक्तपणे जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणारअसल्याची माहिती पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांनी दिली.

## बार परवाना काढून देतो सांगून आठ लाखांची फसवणूक

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील दादर येथील फिर्यादी यांना बार व रेस्टॉरंटसाठी साठी परवाना काढून देतो असे सांगून आरोपीने ८ लाख १० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी कि, दादर सागरी पोलीस ठाणे हद्दीतील दादर सागरी पोलीस ठाणे हद्दीत आरोपी रा. भिवंडी, याने फिर्यादी रा.पेण यांना मी उत्पादन शुल्क विभाग भिवंडी येथे नोकरीस असुन माझी तेथे ओळख आहे. मी ब–याच लोकांनासाठी एफएल ३ लायसन्स काढुन दिले असे सांगुन आरोपी याने फिर्यादी यांचा विश्वास संपादित करुन फिर्यादी व त्यांचा मित्र साक्षीदार यांच्याकडून २५ नोव्हेंबर २०२२ ते दि. १५ फेब्रुवारी २०२३ दरम्यान दादर गावातील एका हॉटेलमध्ये भेटून आरोपीने ८ लाख १० हजार रुपये रोख रक्कम घेउन फसवणुक केली.

या प्रकरणी दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि ४५/२०२५ भा.दं. वि.कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार संदेश ठाकूर हे करीत आहेत.

## सहाय्य योजनेची अंमलबजावणीसाठी घर भेटी, तहसील कार्यालयाचा उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**

महसूल सप्ताह २०२५ अंतर्गत विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांची घरभेट घेऊन त्यांना लाभ देण्याचा उपक्रम खालापूर तहसीलदार अभय चव्हाण यांनी सुरू केल्याने वंचित लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे

डीबीटी पेमेंट पद्धती म्हणजे विविध भारतीय कल्याणकारी योजनांतर्गत सबसिडी आणि इतर फायदे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित केले जातात. डीबीटी मध्ये ३१७ सरकारी योजनांचा समावेश आहे. अखंडपणे उ्द्दढ चा लाभ घेण्यासाठी, लाभार्थींनी त्यांचे बँक खाती त्यांच्या आधारशी लिंक करणे आवश्यक आहे. खालापूर तालुक्यातील अनेक लाभार्थी या योजनांपासून वंचित राहिले होते.



त्या लाभार्थी यांचे डीबीटी करून घेणे साठी खालापूर तालुक्यातील एकूण ३० तलाठी यांनी काम केले.पुरवठा विभागातील केवासी पूर्ण न केलेले २८,८३३ खातेदार, त्या खातेदारांना स्वस्त धान्य दुकानदार यांचे मार्फत केवायसी पूर्ण करणे बाबत सूचना देण्यात आल्या तसेच या तालुक्यांमध्ये नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटप करणे साठी देखील केवायसी करणे यासाठी सरनोबत नेताजी पालकर सभागृह खालापूर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, सदर शिबिरात लोकप्रतिनिधी व लाभार्थी उपस्थित होते.

शिबिरात केवायसी पूर्ण न केलेल्या ४२१ यांच्या पैकी ७५ खातेदारांनी केवायसी पूर्ण केली आहे उर्वरित ३४८ खातेदारांची केवायसी पूर्ण करणे बाबत ग्राम महसूल अधिकारी यांना सूचना दिल्या आले आहेत. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत २५५ डीबीटी न झालेले लाभार्थी पैकी २०० लाभार्थ्यांना घरभेटी देऊन डीबीटी करण्यात आल्या.

तसेच १५ लाभार्थ्यांची आधार सीडिंग करण्यात आली. तसेच मयत व स्थलांतरित लाभार्थ्यांची यादी संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांना सादर करणे बाबत सूचना देण्यात आले आहेत. निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, मंडळ अधिकारी,लेखनिक अमोल वाघ, सर्व महसूल अधिकारी, महसूल कर्मचारी विशेष मेहनत घेत आहेत

## चौक येथे दिव्यांग व आरोग्य तपासणीचे आयोजन, रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**चौक: प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड अलिबाग व मुख्यमंत्री सहाय्यता निधी धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप तसेच आरोग्य तपासणी शिबीर चौक येथील ग्रामीण रुग्णालयात आयोजन करण्यात आले होते, त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराचे उद्घाटन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कल्याणी हिंगोले व वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता कालेल यांच्या हस्ते करण्यात आले.प्रथम अस्थिव्यंग, नेत्र विकार व मानसिक आजार यांच्या रुग्णांची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली.या शिबीराच्या माध्यमातुन खालापूर



तालुक्यातील दिव्यांग व्यक्तिना दिव्यांग प्रमाणपत्र तातडीने मिळावे यासाठी चौक ग्रामीण रुग्णालय प्रयत्नशील असून त्यांच्या प्रयत्नाने दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी करण्यात आली.

यावेळी आरोग्य तपासणी,दंत चिकित्सा,वातावरणातील बदल झाल्याने थंडी,ताप,सर्दी,खोकला यावर देखील उपचार करण्यात आले. लहान मुलांसाठी देखील तपासणी होऊन त्यांना पौष्टिक आहार देण्यात आला.गरोदर माता यांच्या तपासणी बरोबर रुग्णालयातील दाखल रूग्णांची देखील तपासणी करण्यात आली. ६२ दिव्यांग यांना प्रमाणपत्र देण्यात आले. दिव्यांग प्रमाणपत्र घेण्यासाठी अलिबाग येथे जावे लागते, त्यामुळे वेळ व पैसा दोन्ही खर्च होतात हे शिबिर आयोजित केल्याने दिव्यांग यांचा फायदा झाल्याचे दिव्यांग रुग्ण यांनी सांगितले.

तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याणी हिंगोले,वैद्यकीय अधिक्षक डॉ.सविता कालेल, डॉ.विजय म्हसकर, नेत्र चिकित्सक डॉ. सिद्धी डोंगरे, डॉ. समृद्धी दलाल, दंत चिकित्सक डॉ. राजन यादव, समाजसेवक अमित राऊत, सुशील साईकर,प्रतिमा फडतरे, विशाल भांडुर्गे आदी मान्यवरांनी रुग्णांची तपासणी केली.

## मध्य रेल्वेची अनधिकृत प्रवाशांवर कडक कारवाई

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेची अनधिकृत प्रवाशांवर कडक कारवाई केली असून या कारवाईत एप्रिल ते जुलै २०२५ या कालावधीत तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट/ वैध तिकीट नसलेल्या १४.४३ लाख प्रवाशांना पकडले आणि त्यांच्या कडून एकूण रु.८६.७३ कोटींचा दंड वसूल केला.

जुलै २०२५ आणि जुलै २०२४ च्या तुलनेत मध्य रेल्वेने अनियमित प्रवासाच्या प्रकरणांमध्ये ६२ % वाढ नोंदवली असून दंड वसुलीत १००% वाढ झाली आहे. प्रवाशांना सुरक्षित, सुकर व आरामदायक प्रवास सुविधा देण्याच्या आपल्या प्रयत्नांचा भाग म्हणून, मध्य रेल्वे नियमितपणे मेल–एक्सप्रेस, पॅसेंजर, विशेष ट्रेनमध्ये तसेच मुंबई व पुणे विभागातील उपनगरी ट्रेनमधील सर्व विभागांमध्ये व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबवते, जेणेकरून विनातिकीट प्रवासावर नियंत्रण ठेवले जाते.

अनधिकृत प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी, मुख्यालय तसेच सर्व विभागांमध्ये नियमितपणे विविध प्रकारच्या तपासण्या केल्या जातात. यामध्ये स्थानक तपासणी , अचानक धाड तपासणी (म्बुश तपासणी), किल्लाबंदी तपासणी (फोर्ट्रेस चेक), व्यापक तपासणी (खपींशपीळींश लहशलज्ञी) आणि मेगा तिकीट तपासणी मोहिमा यांचा समावेश आहे.

आर्थिक वर्ष २०२५–२६ मधील (एप्रिल ते जुलै २०२५) कालावधीत, मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी वैध तिकीट अथवा प्रवास परवाना नसलेल्या १४.४३ लाख प्रवाशांना पकडले असून, त्यांच्या कडून एकूण रु.८६.७३ कोटींचा दंड वसूल करण्यात आला आहे.

रेल्वे बोर्डाने या कालावधीसाठी निश्चित केलेल्या रु ८१.४८ कोटींच्या उद्दिष्टाच्या तुलनेत हे उत्पन्न ६.४४% ने अधिक असून, तिकीट तपासणीमधून मिळालेल्या महसूलामध्ये लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली आहे.

जुलै २०२५ मध्ये मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी वैध तिकिटाशिवाय प्रवास करणाऱ्या ३.०८ लाख प्रवाशांना पकडले आहे, तर जुलै २०२४ मधील १.९१ लाख प्रवाशांच्या तुलनेत हे प्रमाण ६२% वाढले आहे. जुलै २०२५ मध्ये विनातिकीट वैध तिकीटाशिवाय प्रवास करणाऱ्यांकडून दंड म्हणून १६.०० कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत, जे जुलै २०२४ मधील रू. ७.९७ कोटी रुपयांच्या तुलनेत १००% पेक्षा जास्त वाढ दर्शवते.

मध्य रेल्वे अनियमित प्रवास रोखण्यासाठी आणि प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास अनुभव सुनिश्चित करण्यासाठी अथक परिश्रम करण्यास वचनबद्ध आहे.मध्य रेल्वेचे प्रवाशांना आवाहन आहे कि, योग्य आणि वैध तिकीट खरेदी करून सन्मानाने प्रवास करावा.

## माथेरान प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी संजय भोसले यांची निवड

**माथेरान : बातमीदार**

माथेरान प्रेसक्लब अध्यक्ष पदी जेष्ठ पत्रकार संजय भोसले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

माथेरान प्रेसक्लब अध्यक्ष गिरीश पवार यांनी आपल्या काही वैयक्तिक कारणास्तव माथेरान प्रेसक्लब अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे माथेरान प्रेसक्लब अध्यक्षपदी येथील जेष्ठ पत्रकार संजय भोसले यांची एकमताने निवड करण्यात आली. हॉटेल रंगोली येथे




छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मावळते अध्यक्ष गिरीश पवार यांनी नवोदित अध्यक्ष संजय भोसले यांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन उपस्थित सर्वांचे आभार मानले.तर नवोदित माथेरान प्रेसक्लब अध्यक्ष संजय भोसले यांनी सर्वांना सोबत घेऊन प्रेसक्लबचे काम करूयात आणि पुढील काळात मला सगळ्यांनी साथ द्यावी असे विचार मांडले.यावेळी माथेरान प्रेसक्लबचे सगळे पत्रकार उपस्थित होते.

## जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे ११वी विज्ञान प्रवेशासाठी सुवर्णसंधी

**माणगाव : बातमीदार**

जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता ११ वी विज्ञान (सायन्स) करिता प्रवेश मिळविण्यासाठी सुवर्णसंधी प्राप्त झाली असुन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. भारत सरकारच्या संपूर्ण आर्थिक सहाय्याने जवाहर नवोदय विद्यालय संपूर्ण भारतात चालू करण्यात आली आहेत. या विद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत भोजन, गणवेश, निवास आणि वह्या – पुस्तके आदींची व्यवस्था केली जाते.हे अत्याधुनिक निवासी विद्यालय असून सी.बी.एस.ई., नवी दिल्ली या बोर्डाशी संलग्न आहे गेली अनेक वर्ष या विद्यालयाची १० वी व १२ वी ची १००% निकालाची परंपरा राहिली आहे.

पीएमश्री स्कुल जवाहर नवोदय विद्यालय, निजामपूर ता. माणगांव जि.रायगड येथे इयत्ता अकरावी विज्ञान(सायन्स) शाखेसाठी आवेदन पत्र आमंत्रित केले जात आहेत. पात्रता व आवेदन करण्यासाठी http://nvsropunelap.co.in/class xi या वेबसाईटला भेट द्या. दिनांक १० ऑगस्ट २०२५ पर्यंत परिपूर्ण भरलेले आवेदन पत्र विद्यालयात ईमेल द्वारा किंवा प्रत्यक्षात जमा करावे. अधिक माहितीसाठी प्रवेश प्रभारी श्रीमती शारदा अहिरे मॅडम ७०२०६१४०६९ श्रीमती रश्मी मिश्रा ९०११७३८०४० श्री नितिन बुदगेसर ९४२३२४५५८८ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच या सुवर्णसंधीचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पेणमधील चिंचपाडा येथील विहान बिअर शॉपमध्ये चोरी

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील आर्किटेक सोसायटी चिंचपाडा येथील विहान बियर शॉपी दुकानामध्ये अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी रा. अष्टविनायक सोसायटी चिंचपाडा ता.पेण यांचे आर्किटेक सोसायटी चिंचपाडा येथील विहान बियर शॉपी हे दुकान असून सोमवार दिनांक ४ ऑगस्ट रात्रौ १० ते मंगळवार दिनांक ५ ऑगस्ट रात्रौ १० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यान दुकानाचे शटर कोणत्यातरी लोखंडी हत्याराने एका बाजुने वर करून आतमध्ये प्रवेश करुन काउंटर टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली रोख रक्कम व सीसीटीव्ही कॅमेरा



अस एकूण १४ हजार रुपये किमतीचे सामान चोरून नेले.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार अजिंक्य म्हात्रे हे करीत आहेत.

# आशिया चषकासाठी टीम इंडियात चुरस



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी युवा खेळाडूंमध्ये चुरस निर्माण झाली आहे. भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिल, स्फोटक सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि उदयोन्मुख स्टार साई सुदर्शन हे या स्पर्धेत आघाडीवर असल्याचे एका अहवालात म्हटले आहे. संघाची घोषणा ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे.

सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस भारताला वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी मालिका खेळायची असली, तरी हे तिन्ही खेळाडू आशिया चषक स्पर्धेसाठी उपलब्ध असणार आहेत. व्यस्त वेळापत्रकामुळे गिल आणि जैस्वाल यांनी मागील काही टी-२० मालिकांमध्ये विश्रांती घेतली होती, परंतु इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेनंतर ते निवडीसाठी उपलब्ध असतील, असे मानले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार सध्या भारतीय संघाला पाच आठवड्यांची विश्रांती मिळाली आहे. या काळात क्रिकेट नसल्याने, संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांच्या उत्कृष्ट कामगिरीनंतरही या तिन्ही युवा खेळाडूंना टी-२० संघात संधी मिळायला हवी, अशी चर्चा आहे. २१ दिवस चालणाऱ्या या आशिया चषक स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठल्यास संघाला एकूण सहा सामने खेळावे लागतील. त्यामुळे खेळाडूंवर अतिरिक्त ताण येणार नाही. शिवाय, १७ सदस्यीय संघ निवडण्याची परवानगी असल्याने निवड समिती विविध पर्यायांचा काळजीपूर्वक विचार करत आहे. युएईमधील खेळपट्ट्या आणि सहा महिन्यांवर येऊन ठेपलेला टी-२० विश्वचषक लक्षात घेता जैस्वाल, गिल आणि सुदर्शन यांना आघाडीच्या फळीत आजमावणे हा एक योग्य निर्णय ठरू शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.

२०२३च्या अखेरीस भारतीय संघासाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा साई सुदर्शन सध्या टी-२० प्रकारात उत्कृष्ट लयीत आहे. त्याच वेळी, जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज या प्रमुख गोलंदाजांची उपलब्धता देखील महत्त्वपूर्ण ठरेल. या दोन्ही खेळाडूंना आशिया चषक स्पर्धे नंतर लगेचच कसोटी मालिका खेळायची असल्याने त्यांच्या कार्यभाराचे व्यवस्थापन करणे हे संघ व्यवस्थापनापुढील एक मोठे आव्हान असणार आहे.

आशिया चषक स्पर्धेचा अंतिम सामना २८ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल आणि त्यानंतर अवघ्या एका आठवड्यात म्हणजेच २ ऑक्टोबरपासून अहमदाबादमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध पहिला कसोटी सामना सुरू होईल. या पार्श्वभूमीवर, जैस्वाल (आयपीएल २०२५मध्ये ५५९ धावा, १६० स्ट्राइक रेट), गिल (६५० धावा, १५५पेक्षा जास्त स्ट्राइक रेट) आणि ऑरेंज कॅप विजेता साई सुदर्शन (७५९ धावा, १५६ स्ट्राइक रेट) यांच्या नावाचा गांभीर्याने विचार होत आहे.

## ‘आयसीसी’च्या पुरस्कारासाठी गिलला नामांकन

**दुबई :** भारताच्या कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिलला आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) जुलै महिन्यासाठी सर्वोत्तम खेळाडूच्या पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे.



त्याची दक्षिण आफ्रिकेचा वियान मुल्डर आणि इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स या अष्टपैलू खेळाडूंशी स्पर्धा आहे. गिलने इंग्लंडविरुद्ध नुकत्याच झालेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत फलंदाजीत अनेक विक्रम रचले. गिलने मालिकेत ७५.४०च्या सरासरीने आणि चार शतकांच्या मदतीने ७५४ धावा केल्या. यामध्ये एका द्विशतकाचाही समावेश आहे. कसोटी मालिकेत भारतीय कर्णधाराने केलेल्या सर्वाधिक धावांचा सुनील गावस्कर (७३२ धावा) यांचा विक्रम गिलने मोडीत काढला. गिल सार्वकालिक कर्णधारांच्या यादीत, सर डॉन ब्रॅडमननंतर (८१० धावा) दुसऱ्या स्थानावर आहे.



# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त प्री-इंटर स्कूल बास्केटबॉल स्पर्धा

## खारघर स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर पनवेलचे कार्यसम्राट व कार्यतत्पर आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी नेहमीप्रमाणेच आपल्या सहकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना आवाहन केले होते की त्यांचा वाढदिवस हा समाज हितासाठी खर्च करत अथवा प्रेम व्यक्त करा कृतीतून या भावनेतून साजरा करण्याचे सांगितले होते. या आवाहन खारघर येथील भारतीय जनता पार्टीचे मंडळ उपाध्यक्ष व खारघर स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष किरण पाटील तसेच पनवेल महानगरपालिकेच्या मा नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी खारघर स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने खारघर सेक्टर १९ येथील खेळाच्या मैदानात प्री-इंटर स्कूल बास्केटबॉल स्पर्धांचे आयोजन करून साजरा केला.

खारघर स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने खारघर शहरातील व परिसरातील मुला मुलींना नेहमीच मोबाईल से मैदान तक या दृष्टिकोनातून तरुणांना विविध खेळांची आवड निर्माण व्हावी यासाठी विविध खेळांचे सामने तसेच स्पर्धा आयोजित करण्यात येतात. आमदार प्रशांत दादा ठाकूर यांचा वाढदिवस हा ५ ऑगस्ट रोजी असतो त्याचे औचित्य साधात रविवार ३ ऑगस्ट रोजी प्री इंटर स्कूल बास्केटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये खारघर मधील जवळपास आठ शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या २० संघांनी सहभाग नोंदवला. सदर स्पर्धेचे उद्घाटन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे सुरक्षा अधिकारी व स्टेट बॉक्सिंग प्लेयर सिद्धेश टावरी व अरुण ससमल केंद्र सरकारच्या सेवेतील सेवानिवृत्त एक्साईज उपायुक्त व बास्केटबॉल खेळाडू यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व श्रीफळ अर्पण करून करण्यात आले.

सिद्धेश टावरी यांनी खेळाडूंना सांगितले की, खेळात जय-पराजय हे सुरूच असते परंतु खेळणे हे सगळ्यात महत्त्वाचे आहे. सदर सामन्यांना भेट देण्यासाठी दिवसभरात अनेक मान्यवर आले प्रामुख्याने पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर संध्याकाळच्या वेळेस लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीदेखील भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. तसेच खारघर स्पोर्ट्स अकॅडमी चे अध्यक्ष किरण पाटील व नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांच्या वतीने प्रभागातील तसेच खारघर शहरातील खेळाडूंसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचे कौतुक केले.

स्पर्धांच्या बक्षीस वितरणासाठी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली त्यांच्या हस्ते विजेत्या संघांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. बक्षीस वितरणाला प्रमुख पाहुणे म्हणून स्वामीनाथन राजगोपालन यांची उपस्थिती राहिली. ते स्वतः एशियन बास्केटबॉल चॅम्पियन राहिलेले आहेत. तसेच ते महाराष्ट्राचे बास्केटबॉल टीमचे राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक म्हणून नऊ वेळा होते. स्वामीनाथन राजगोपालन यांना शिवछत्रपती अवॉर्डने सन्मानित करण्यात आलेले आहे. स्वामीनाथन रामराजगोपालन यांच्यासारख्या नावाजलेल्या इंडियन बास्केटबॉल खेळाडूची उपस्थिती लाभली.

आमदार प्रशांत ठाकूर ह्यांनी नगरसेविका नेत्रा पाटील व खारघर स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष किरण दादा पाटील ह्यांच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. भर पावसात बास्केटबॉल सारख्या स्पर्धा घेणं आव्हानात्मक होत तरीदेखील स्पर्धा आयोजित करून ती यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल विशेष कौतुक केले. वर्षभर लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात ते नेहमीच सक्रिय असतात आणि युवा पिढीसमोर एक आदर्श ठेवतायत असेही म्हणाले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी दिलीप जाधव, आदित्य हा गे, कुणाल देवकर, दिनेश यादव, वैभव शेजवळ,रणजीत पाटील, विनोद कढरे, संदीप पाटील, नितीन पाटील यांनी अथक परिश्रम घेतले. खारघर स्पोर्ट्स अकॅडमी चे बास्केटबॉल प्रशिक्षक इम्तियाज बागलकोटे व प्रिन्स या दोघांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. या स्पर्धांचे सूत्रसंचालन डॉ. कोमल कुलकर्णी, अनुजा राऊत, सीमा सातपुते तसेच प्रेरणादायी वक्ते (मोटिवेशनल स्पीकर) नवीन खरे यांनी केले.

### १४ वर्षाच्या आतील विजेते स्पर्धक

**मुले:** पहिले पारितोषिक न्यू होरिझन पब्लिक स्कूल यांनी पटकावले. दुसरे पारितोषिक विबग्योर स्कूल खारघर. तिसरे पारितोषिक विश्वज्योत हायस्कूल खारघर मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयरच पारितोषिक निहार याला मिळाले तर बेस्ट शूटर म्हणून रुद्रला मिळाले.

**मुली :** पहिले पारितोषिक पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, नेरूळ, दुसरे पारितोषिक इंडॉस्कॉट्स ग्लोबल स्कूल, कामोठे, तिसरे पारितोषिक बालभारती पब्लिक स्कूल खारघर, मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर म्हणून साक्षी व बेस्ट शूटर सिया यांना देण्यात आले.

### १७ वर्षाच्या आतील विजेते स्पर्धक

**मुले:** पहिले व दुसरे पारितोषिक बालभारती पब्लिक स्कूल खारघर, तिसरी पारितोषिक इंडॉस्कॉट्स ग्लोबल स्कूल. मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर ध्रुव व बेस्ट शूटर म्हणून अवधूत यांना गौरविण्यात आले.

**मुली :** पहिली व दुसरे पारितोषिक बालभारती पब्लिक स्कूल, खारघर, तिसरे पारितोषिक विश्वजीत हायस्कूल खारघर. मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर परिधी व बेस्ट शूटर स्नेहा यांना गौरवण्यात आले.

## पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र शासन पुणे अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय टेबल टेनिस स्पर्धा बुधवारी (दि.१३) मुलांच्या व गुरूवार १४ ऑगस्ट २०२५ रोजी मुलींच्या शालेय टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धेतील वयोगट १४ वर्षाखालील मुले व मुली,१७ वर्षाखालील मुले व मुली, १९ वर्षाखालील मुले व मुली असा आहे.अशा विविध गटात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस प्रशिक्षक संजय सुदाम कडू यांच्या शुभहस्ते नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ, सिडको समाज मंदिर, दुसरा मजला, सेक्टर १८, नवीन पनवेल येथे सकाळी ९.३० वाजता करण्यात येणार आहे.

स्पर्धेतील प्रत्येक गटातील विजेत्या संघाला रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय सुदाम कडू यांच्यातर्फे आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहे तरी सदर स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभाग घेऊन टेबल टेनिस खेळात रंजकता वाढवावी.

## वसीम जाफर ‘व्हीसीए’च्या सल्लागारपदी

**मुंबई : प्रतिनिधी**



विदर्भ क्रिकेट असोसिएशनने भारताचा माजी सलामीवीर वसीम जाफरची फलंदाजी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. २०२५-२६च्या देशांतर्गत हंगामात जाफर विदर्भातील खेळाडूंना फलंदाजीचे धडे शिकवणार आहे. या व्यतिरिक्त मुंबईचा माजी वेगवान गोलंदाज विशाल महाडिक यांची विदर्भ अंडर-१९ संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. विदर्भ हा गत रणजी ट्रॉफी चॅम्पियन आहे.

जाफरचे विदर्भाशी पूर्वीपासूनच चांगले संबंध राहिले आहेत. कारकिर्दीच्या अखेरीस त्याने नागपूरच्या संघाचे प्रतिनिधित्व केले. त्याने २०१७-१८मध्ये रणजी ट्रॉफीत आणि त्यानंतर २०१८-१९मध्ये इराणी चषक स्पर्धेत नागपुरच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. विदर्भ क्रिकेट असोसिएशनने आपल्या निवेदनात म्हटले आहे की, वसीम जाफर हे विर्दभातील अंडर-१४ संघापासून ते वरिष्ठ संघापर्यंत सर्व वयोगटातील खेळाडूंचे फलंदाजी सल्लागार असतील. जाफरने पंजाब, उत्तराखंड आणि ओरिसा येथे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम केले. २०१९-२०२१ पर्यंत पंजाब किंग्जचे फलंदाजी प्रशिक्षक म्हणूनही काम पाहिले आहे.

**अशी आहे कारकीर्द**

जाफरने ३१ कसोटी सामन्यांमध्ये ३४.१०च्या सरासरीने एक हजार ९४४ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये पाच शतके समावेश आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याची कामगिरी दमदार ठरली. त्याने २६० प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ५७ शतकांसह १९ हजार ४१० धावा केल्या आहेत. २००८-०९ आणि २००९-१०मध्ये त्याने मुंबईला दोन रणजी ट्रॉफी जेतेपद मिळवून दिले.






# स्पेशल ऑलिम्पिक्स भारत महाराष्ट्रतर्फे राष्ट्रीय जलतरण स्पर्धा बक्षीस वितरण

**मुंबई : प्रतिनिधी**

स्पेशल ऑलिम्पिक भारत (एसओबी) ही जागतिक स्पेशल ऑलिम्पिक चळवळीची भारतीय शाखा आहे. ही संस्था बौद्धिक अक्षम व्यक्तींना (पूर्वी मतिमंद म्हणत आता तो शब्द प्रतिबंधित आहे) खेळांचे पूर्ण वर्ष प्रशिक्षण व स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत आहे.



१९९२ साली स्थापन झालेल्या या संस्थेने सामाजिक समावेश वाढवण्यात, खेळाडूंना सक्षम बनवण्यात आणि बौद्धिक दिव्यांगता (Intelectually Disabled) संदर्भातील रूढ समजुतींना आव्हान देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.

राष्ट्रीय युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI) यांच्या मान्यतेने ही संस्था कार्य करते. स्पेशल ऑलिम्पिक्स भारततर्फे राष्ट्रीय जलतरण स्पर्धा पहिल्यांदाच महाराष्ट्रात आयोजित केली गेली. त्यासाठी २२ राज्यांतून ११० बौद्धिक अक्षम जलतरणपटुंनी सहभाग घेतला. ही स्पर्धा पाहण्यासाठी मुंबई महानगर पालिकेच्या १९ विशेष शाळांतील तसेच मुंबईतील २७ शासकीय विशेष शाळांतील बौद्धिक अक्षम विद्यार्थी आले होते.

आज दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी स्पेशल ऑलिम्पिक भारत ,महाराष्ट्र तर्फे दोन दिवस चाललेला नॅशनल जलतरण स्पर्धेचा रोमहर्षक थरार पार पडला. त्याच्या बक्षीस समारंभासाठी महामहीम राज्यपाल सी . पी.राधाकृष्णन विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तर अतुल सावे (इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक, ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभाग मंत्री, तसेच डॉ. मल्लिका नड्डा, राष्ट्रीय अध्यक्ष स्पेशल ऑलिम्पिक भारत डॉ. मेधाजी सोमैया (अध्यक्षा), डॉ. भगवानजी तलवारे - (क्षेत्र संचालक),उपस्थित होते. या वेळी राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत फ्री स्टाईल, बॅंक स्ट्रोक, बटरफ्लाय, रिले यासारख्या विविध प्रकारांचा समावेश होता. यामध्ये थलिट नी सुवर्ण २२, चांदी २१ तर ,२० कांस्य पदकांची कमाई केली.

राज्यपाल महोदयांनी महाराष्ट्राने प्रथमच आयोजिलेल्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेचे तोंडभरून कौतुक केले तसेच लागेल ती मदत देण्याची तयारी दर्शवली. भारत सरकार महाराष्ट्र सरकार तसेच खास करून बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी केलेल्या सहकार्यामुळेच एवढा मोठा कार्यक्रम आपण आयोजित करू शकलो आणि यशस्वी करू शकलो.

राज्यपाल पुढे म्हणाले की, या बौद्धिक अक्षम दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी एक समरसता म्हणजेच त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्व प्रयत्न आम्ही करू,त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यापीठात स्वतंत्र विभाग तयार करून त्यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी खास प्रशिक्षण देण्याचे प्रयत्न करण्याचे मी आश्वासन देतो.

अतुल सावे यांनी सांगितले की, संभाजीनगर, नागपूर, पुणे, मुंबई अशा ठिकाणी क्रीडा स्टेडियम्स आहेत त्याची व्यवस्था चांगल्या प्रकारे ठेवण्यात येईल. तसेच तिथे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेची तरतूद करण्यात येईल. याचप्रमाणे सरकारमध्ये स्पेशल ऑलिम्पिक भारत याच्या बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या साठी आवश्यक असलेले नीतीनियम यामध्ये बदल करण्यात येतील, असे आश्वासन दिले. मल्लिका नड्डा यांनी असे सांगितले की, शिक्षण, खेळ व आरोग्य हा स्पेशल ऑलिम्पिक भारत चा प्रमुख पाया आहे.तसेच एकात्म शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी करण्यासाठी महाराष्ट्र व भारत कटिबद्ध आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com